सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. १८ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ४६ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पाकिस्तानला मिळणार आणखी एक झटका
### भारताकडून नद्यांवरील प्रकल्पांच्या कामाला गती

नवी दिल्ली: जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २७ हिंदू पर्यटकांचा नरसंहार केला होता. त्यानंतर भारताने पाकिस्तानशी असलेला सिंधी पाणी करार रद्द केला. आता आणखी एक पाऊल टाकत भारताने सिंधू पाणी करार स्थगित झाल्यापासून चिनाब, झेलम आणि सिंधू नद्यांवर प्रकल्पाचे काम वेगाने सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे सिंधू करार रद्द झाल्याने संकटात सापडलेल्या पाकिस्तानला आणखी एक झटका बसणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्पष्टपणे म्हटले आहे की, पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत



नाही. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी १३ मे रोजी स्पष्ट केले होते की, पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही, तोपर्यंत भारत सिंधू पाणी करार स्थगित ठेवला जाईल. यासोबतच भारताने आपल्या मुख्य प्रकल्पांपैकी एक म्हणजे चिनाब नदीवरील रणबीर धरणाची लांबी दुप्पट करण्याचा निर्णय घेतला आहे. या नदीचे पाणी भारतातून पाकिस्तानातील पंजाबमधील शेती क्षेत्रात जाते.

जेव्हा भारत आपला प्रकल्प पूर्ण करेल, तेव्हा ते प्रति सेकंद १५० घनमीटर पाणी वळवू शकेल, सध्या फक्त ४० घनमीटर पाणी वळवण्याची क्षमता आहे. यासोबतच भारत रणबीर कालव्याच्या विस्ताराच्या योजनेसोबतच, अशा प्रकल्पांवरही विचार करतोय, ज्यामुळे पाकिस्तानला वाटप केलेल्या नद्यांमधून पाण्याचा प्रवाह कमी होईल. यामुळे पाकिस्तानला स्वतःसाठी वीज निर्मिती करण्यासाठी देखील अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल. त्याशिवाय भारताने जम्मू आणि काश्मीर प्रदेशात जलविद्युत प्रकल्पांची यादी तयार केली आहे, ज्यामुळे वीज निर्मिती ३,३६० मेगावॅटवरून १२ हजार मेगावॅटपर्यंत वाढेल. या प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठवू शकणारे धरणे देखील समाविष्ट आहेत.

### बंगालच्या उपसागरात 'शक्ती' चक्रीवादळाचा इशारा

नवी दिल्ली : बंगालच्या उपसागरात 'शक्ती' या चक्रीवादळाच्या निर्माणाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. १६ ते १८ मे दरम्यान कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवसांत चक्रीवादळात रूपांतरित होऊ शकते. हे वादळ २३ ते २८ मेच्या दरम्यान ओडिशा, पश्चिम बंगाल व बांगलादेशाच्या किनारपट्टी भागांना धडकू शकते.

हवामान खात्याने ओडिशा आणि पश्चिम बंगालसह संपूर्ण पूर्व किनारपट्टीला सतर्कतेचा इशारा दिला आहे. मासेमारांना समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. प्रशासनाकडून आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## भाजपा महिला मोर्चा तर्फे राज्यभर 'सिंदूर यात्रा'

मुंबई : पहलगाम येथे २६ निरपधराध भारतीयांच्या हल्ल्याला ऑपरेशन सिंदूर द्वारे मोदी सरकारने चोख उत्तर दिले. पहलगाम हल्ल्यात ज्यांचे कुंकू पुसले गेले अशा आपल्या भगिनींच्या अश्रूचा भारतीय सैन्याने बदला घेतला. भारतीय सैन्य दलाच्या जवानांच्या शौर्याला वंदन करण्यासाठी भारतीय जनता पार्टी प्रदेश महिला मोर्चातर्फे राज्यभर सिंदूर यात्रांचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ यांनी शनिवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ. चित्रा वाघ बोलत होत्या. प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले आदी यावेळी उपस्थित




होते. आपण २१ मे रोजी नांदेड येथे काढण्यात येणाऱ्या सिंदूर यात्रेत सहभागी होणार आहोत, अशी माहितीही आ. चित्रा वाघ यांनी दिली.

दहशतवाद्यांच्या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी केलेल्या कारवाईत मिळालेले यश भारतीय स्त्री शक्तीला समर्पित केल्याबद्दल आणि या कारवाईला ऑपरेशन सिंदूर असे नाव दिल्याबद्दल समस्त महिला शक्तीतर्फे आ. चित्रा वाघ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. आ. चित्रा वाघ यांनी सांगितले की, दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला जबरदस्त उत्तर देत भारतीय लष्कराने नवभारताची प्रचिती आणून दिली आहे. या मोहिमेत भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखविले. सैन्य दलाच्या पराक्रमाला, अढळ निश्चयाला अभिवादन करण्यासाठी भाजपा महिला मोर्चातर्फे देशभर सिंदूर यात्रांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचा एक भाग म्हणून महाराष्ट्रातही अशा यात्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ही सिंदूर यात्रा निघणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

## उपचारादरम्यान मुलाचा मृत्यू

गंगापूर दि.१७ : छत्रपती संभाजी नगर अहिल्यानगर मार्गावरील जुने कायगाव येथे शुक्रवार (ता.९) रोजी आयशर चे धडकेने गंभीर जखमी झालेला १४ वर्षीय मुलाचे उपचारादरम्यान निधन झाले. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की रेहान हकीम शेख (वय १४) हा जुने कायगाव येथील कयूम कादर भडांगे यांच्या शेतात आपल्या आई, मामा व बहिणी सोबत राहत होता. शुक्रवार (ता.९) रोजी संध्याकाळी पाच वाजेच्या दरम्यान रेहान यांनी भूक लागल्याने पैसे घेऊन काहीतरी खाण्यासाठी घेऊन येत असे सांगून घराबाहेर पडला.जुने कायगाव येथील पेट्रोल पंपा जवळ आयशर क्र. सी जी ०७ सी एल ६८८३ ने रिहान रस्त्याच्या एका बाजूने पंख्यावरून जात असताना मागून येऊन त्याला जोरदार धडक दिली. धडके दरम्यान त्याच्या दोन्ही पायावरून गाडी गेल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने छत्रपती संभाजी नगर च्या घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्याच्यावर उपचार चालू असताना तो बुधवार (ता.१४) रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास तो मरण पावला. याविषयी त्याची आई सुरया हकीम शेख (वय ३७) राहणार खंडोबा मंदिराजवळ सातारा परिसर छत्रपती संभाजी नगर ह.मु. जुने कायगाव हिच्या फिर्यादीवरून गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा शुक्रवार (ता.१६) रोजी आयशर चालक च्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गंगापूर पोलीस करीत आहे.

## सिडकोच्या सर्वच सेवा आता होणार ऑनलाइन
### कृती आराखडा अभियानांतर्गत ९० टक्के प्रकरणांचा निपटारा

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

नागरिकांना सेवा मिळण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी सेवा हमी अधिनियम २०१५ तसेच शासनाच्या क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा अंतर्गत सिडकोच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या १३ सेवांपैकी ०२ सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सिडकोची महसुली देयके अथवा थकबाकी भरणा ही सेवा देखील लवकरच ऑनलाईन उलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी नागरिकांना प्रत्यक्ष बँकेत जावून चलन भरणा करण्याची आवश्यकता राहणार नाही. उर्वरित सेवादेखील ई-ऑफिस प्रणालीद्वारे ऑनलाईन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सिडकोचे नियोजन सुरू असल्याची माहिती सिडकोच्या मुख्य प्रशासक (नवीन शहरे) भाग्यश्री विसपुते यांनी माध्यम प्रतिनिधींना दिली.

**विहित मुदतीत निपटारा**

**सिडको कार्यालयात विविध विभागाअंतर्गत प्राप्त प्रकरणांचा विहित मुदतीत निपटारा करण्याच्या दृष्टीने सेवा हमी अधिनियम-२०१५ अंतर्गत तसेच विशेष अभियानाअंतर्गत वसाहत, पणन, भूमापन, भू-मूल्यांकन इत्यादी विभागाच्या प्राप्त प्रकरणांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.**

**प्राप्त प्रकरण संख्या ५,९६३, निकाली प्रकरण संख्या ५,२०४, कार्यवाही प्रस्तावित संख्या ७५९, प्रलंबित प्रकरण संख्या 00, एकूण ५,९६३ म्हणजेच सुमारे ९0 टक्के प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे, अशी माहिती मुख्य प्रशासक विसपुते यांनी दिली.**

१०० दिवसांचा कृती आराखडा अभियानाअंतर्गत सिडकोस प्राप्त जवळपास ५,९६३ प्रकरणांपैकी ५,२०४ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, निपटऱ्याचे हे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. यापुढेही सिडकोद्वारे अधिसूचित सेवांसाठी नागरिकांना वारंवार सिडको कार्यालयात येणाची गरज पडणार नाही. यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. वसाहत, पणन, भूमापन, भूमूल्यांकन, नियोजन, अभियांत्रिकी व लेखा विभागाकडून वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. संबंधित विभागप्रमुखांना तशा सूचना देण्यात आल्या असल्याचे विसपुते यांनी सांगितले.

### विजय गायकवाड यांची युवा सेना तालुकाप्रमुख पदी निवड



बिडकीन दि १७ में - पैठण युवा सेना तालुका प्रमुख पदी .विजय गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली पैठण आमदार विलास भुमरे यांच्या हास्ते नियुक्ती पत्र देऊन नियक्ती करण्यात आली. यावेळी काकासाहेब देसाई, रामदास गायकवाड ,भानुदास गायकवाड ,भास्कर महाजन, राजू साबळे ,भागवत कुंटे,मुन्ना तिनगोटे,गोकुळ जाधव,ऋषिकेश शर्मा,विशाल गायकवाड ,विजय जाधव ,आदींची उपस्थिती होती.

## जास्तीत जास्त भूभागावर वीज अटकाव यंत्रे बसवा-डॉ. नीलम गोऱ्हे

छत्रपती संभाजीनगर, दि.१६ (जिमाका)- पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात विजा कोसळून जीवित आणि वित्तहानी होते, ही हानी टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जास्तीत जास्त भूभागावर वीज अटकाव यंत्रे बसवा, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आज जिल्हा प्रशासनास दिले.

सुभेदारी विश्रामगृह येथे आज डॉ. श्रीमती गोऱ्हे यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीत अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान, महिला व बालकल्याण विभागाच्या योजना, आरोग्य, ऊसतोड कामगार या विषयांचा आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा



परिषद ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपोवळे, कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत, महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाचे संबंधित अधिकारी, जिल्हा महिला बालविकास अधिकारी रेशमा चीमंद्रे, शिक्षणाधिकारी प्राथमिक जयश्री चव्हाण,महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी सुवर्णा जाधव आदी बैठकीस उपस्थित होते.

विजा कोसळून होणारी जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी वीज अटकाव यंत्रणा कार्यान्वित करावी. यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधीची विशेष तरतूद करावी. जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी पुढाकार घेऊन प्रत्येक आरोग्य केंद्रांमध्ये लाडक्या बहिणी व त्यांच्या किमान पाच सहकाऱ्यांची आरोग्य तपासणी करावी. महिलांना होणारे गर्भाशयाचे कर्करोग, स्तनाचे कर्करोग, रक्तक्षय व इतर आजारासंदर्भातची तपासणी होऊन त्यावर उपचार करणे शक्य होईल. त्याद्वारे जिल्ह्यातील महिलांच्या आरोग्याचा स्तर उंचावण्यास मदत होईल. प्रत्येक शासकीय आरोग्य केंद्रातआरोग्य सुविधा सह औषधे यांचा साठाही उपलब्ध करून देण्याबाबतही नियोजन करावे. शाळेमध्ये 'गुड टच बॅड टच' सारखे उपक्रम राबवून पोलीस यंत्रणेने शाळेमध्ये निर्भय वातावरण करण्यासाठी पोलीस दीदी आणि पोलीस काका यांच्या माध्यमातून वारंवार भेटी द्यावेत. विद्यार्थ्यांमध्ये निर्भय वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश नीलम गोऱ्हे यांनी दिले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यामध्ये दशसूत्री उपक्रमा अंतर्गत शाळा महाविद्यालयमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण, आरोग्य, तांत्रिक कौशल्य, निर्भय वातावरण, यासाठी उपक्रम राबविले जात असून या उपक्रमाची माहिती यावेळी दिली . विद्यार्थ्यांना समुपदेशन, तक्रारपेटी, शाळांमध्ये तक्रार करण्यासाठी संपर्क क्रमांक यासाठीचे उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले.

जिल्ह्यामधील ऊसतोड कामगारांची नोंदणी एकूण २५८१३ असल्याचे पंचायत विभागामार्फत सांगितले. या ऊसतोड कामगारांसाठीच्या कामगार विभाग, सामाजिक न्याय विभाग व इतर विभागाने समन्वयाने ऊसतोड कामगारांच्या शैक्षणिक,आर्थिक विकासासाठी योजनांचा लाभ द्यावा,असे निर्देश श्रीमती गोऱ्हे यांनी दिले.

### ८ लाख शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप : अजित पवार

बारामती : बदलत्या काळात सौर उर्जेकडे वळणे गरजेचे झाले आहे. त्यामुळे सौर उर्जेवर शेतीपंप चालावेत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. राज्यातील आठ लाख शेतकर्यांना सौर ऊर्जा पंप देण्यासाठी २४ हजार कोटींची तरतूद केली आहे. त्यामुळे वीज बिल कमी होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. बारामती तालुक्यातील मुढाळे येथे महापारेषण कंपनीकडून २२० केव्ही उपकेंद्राचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते झाले, या वेळी ते बोलत होते. लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ मिळाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारली आहे. आता आम्ही या योजनेवर महिलांना कर्ज देणार असल्याचं सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, सौर उर्जेचा वापर वाढण्याची आता गरज आहे. १ लाख ३० हजार घरांसाठी ५०० मॅगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा पंप शासनाने बसवले आहेत.

## अचानक आ. मुटकुळेंची तब्येत बिघडली

हिंगोली, १७ मे : भारतीय जनता पक्षाच्यावतीने शनिवारी शहरात तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यमंत्री मेघनाताई साकोरे यांच्या नेतृत्वात ही रॅली गांधी चौकातून पोस्ट ऑफीस मार्गे छत्रपती शिवाजी



महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यापर्यंत पोहोचली. या ठिकाणी समारोपीय कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूतळ्यास पुष्पहार अर्पण करतांना भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांना अचानक भोवळ आली. हा प्रकार सोबत असलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांना तातडीने उचलून खाली उतरवण्यात आले. त्यानंतर उपचारासाठी एका खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यामुळे त्यांना भोवळ आल्याचे सांगण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## गोव्याचा समुद्र पहाण्यासाठी येणारे लोक आता सनातनच्या कार्यामुळे भारतीय संस्कृती पहाण्यासाठी येतात ! - डॉ. प्रमोद सावंत
### गोवा सरकारच्या वतीने सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा विशेष सन्मान

फोंडा, गोवा - पूर्वी गोव्यात लोक समुद्र, तसेच अन्य गोष्टी पहाण्यासाठी येत होते; याउलट गोव्यात सनातन संस्थेचे कार्य चालू झाल्यावर नागरिक भारतीय संस्कृती आणि मंदिरे पहाण्यासाठी गोव्यात येतात. गोवा भोगभूमी नसून ही देवभूमी आहे. सनातन संस्कृती आणि शंखनाद महोत्सव यांमुळे येथील अर्थकारण आणि सांस्कृतिक पर्यटन वाढेल. गेल्या २५ वर्षांपासून सनातन संस्था हिंदु धर्माचा प्रसार करण्याचे मोठे कार्य करत असून सनातनने केलेली आध्यात्मिक ग्रंथनिर्मिती युवक यांना प्रेरणा देणारी आणि पुढील १०० वर्षांपर्यंत दिशादर्शक आहे. सनातन संस्थेचे कार्य समाजासाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे, असे गौरवोद्गार गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी काढले.

सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून गोव्यात १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत फार्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे ऐतिहासिक आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी गोवा शासनाच्या वतीने सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांना शाल-श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन विशेष सन्मान केला, तर देशाच्या संरक्षण कार्यासाठी सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या हस्ते मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे साहाय्यता निधी सुपूर्द करण्यात आला.

या महोत्सवासाठी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले



आणि सौ. कुंदा जयंत आठवले यांच्या वंदनीय उपस्थितीसह २३ देशांतील १९ हजारांहून अधिक भाविक उपस्थित आहेत. प्रकृतीस्वास्थ्य ठिक नसतांनाही साधक आणि भक्तांच्या प्रेमासाठी महोत्सवासाठी उपस्थित असणारे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या दर्शनाने उपस्थित साधक, हिंदुत्वनिष्ठ भावविभोर झाले. महोत्सवाच्या प्रारंभी शंखनाद, गणेशवंदना आणि वेदमंत्रपठाण झाल्यावर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

या प्रसंगी गोवा येथील कुंडई येथील दत्त पद्मनाभ पीठाचे पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंद स्वामीजी, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पू. देवकीनंदन ठाकूर, केंद्रीय उर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक, गोव्याचे वीजमंत्री श्री. सुदीन ढवळीकर, गोवा राज्याचे समाजकल्याणमंत्री श्री. सुभाष फळदेसाई, भाजपचे गोवा राज्याचे प्रदेशाध्यक्ष श्री. दामोदर नाईक, कर्नाटक येथील म्हैसूर राजघराण्याचे युवराज तसेच म्हैसूरचे खासदार श्री. यदुवीर कृष्ण दत्त चामराज वाडीयार, 'सुदर्शन न्यूज'चे प्रधान संपादक श्री. सुरेश चव्हाणके, सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. चेतन राजहंस आणि श्री. अभय वर्तक उपस्थित होते.

हिंदूंनो, राम-कृष्ण यांचा आदर्श ठेवून शक्तीची उपासना करा ! - पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंद स्वामी, गोवा

आज गोव्याची समाजात जी मलिन प्रतिमा होती, ती दूर होऊन एक सात्त्विक परशुराम भूमी म्हणून गोव्याची ओळख सनातन संस्थेच्या कार्यामुळे निर्माण झाली आहे. श्री हनुमान, श्री राम, श्री कृष्ण यांच्या हातात आयुधे आहेत. ही आयुधे धर्माच्या रक्षणासाठी आहेत. आम्हाला शांती हवी आहे. सनातन धर्म टिकल्यानंतरच जगात विश्वास अन् शांती निर्माण होईल. आज हिंदू जागा न झाल्यास, तर उद्याचा दिवस आपला रहाणार नाही. सर्व समाजाने सनातनच्या राष्ट्र आणि धर्म कार्यात सहभागी होण्याची आवश्यकता आहे. आम्हीही या कार्यात सहभागी आहोत. या कार्याला आमचेही आशीर्वाद आहेत.

राष्ट्राचे सनातनत्व टिकवून ठेवण्यासाठी 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव'! - चेतन राजहंस

पहलगाममध्ये आतंकवाद्यांनी पर्यटनासाठी आलेल्या हिंदूंची त्यांचा धर्म विचारून हत्या केली. त्यामुळे भारतासमोर उभी असलेली आव्हाने पाहिली, तर 'सनातन धर्मियांचे अस्तित्व आणि सनातन धर्माचे संरक्षण' अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे सनातन धर्माला पुनर्वैभव प्राप्त करून देण्यासाठी 'शंखनाद महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव धर्मभक्तांना आध्यात्मिक बळ देईल, एक नवचैतन्य आणि ऊर्जा प्रदान करेल.

कर्नाटक येथील म्हैसूर राजघराण्याचे युवराज तसेच म्हैसूरचे खासदार श्री. यदुवीर कृष्ण दत्त चामराज वाडीयार म्हणाले, ''अध्यात्म हाच आपला सर्वांचा मूळ गाभा आहे आणि तीच आपल्या सनातन राष्ट्राची मूळ संकल्पना आहे. सनातन राष्ट्र ही राजकीय सत्ताव्यवस्था नसून आध्यात्मिक सेवाभावाने केलेली व्यवस्था आहे.'' या प्रसंगी गोव्याचे वीजमंत्री श्री. सुदीन ढवळीकर, भाजपचे गोवा राज्याचे प्रदेशाध्यक्ष श्री. दामोदर नाईक यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. महोत्सवाच्या प्रारंभी धर्मसंस्थापनेसाठी १ कोटी 'श्रीराम जय राम जय जय राम' या नामजपास प्रारंभ करण्यात आला.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शहरात वीर जवानांच्या सन्मानार्थ तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ मे -**

समस्त तुळजापूर शहरवासी यांच्या वतीने 'ऑपरेशन सिंदूर'मधील वीर जवानांच्या सन्मानार्थ शहरात भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मंदिर महाद्वार पर्यंत ही रॅली काढण्यात आली होती. शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या रॅलीत



सहभाग नोंदवला आणि मोठ्या उत्साहात ही रॅली संपन्न झाली. रॅलीचे उद्घाटन तुळजाभवानी देवीचे महंत वाकोजी बुवा यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारावून गेले होते. या कार्यक्रमासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील, भाजपा नवनिर्वाचीत जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य रॅली संपन्न झाली. शहरातील सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर महिला व माजी सैनिक व सैन्यात असलेल्या नागरिकांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते यात्रसंगी सैन्यात असलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला हा कार्यक्रम उत्कृष्टपणे राबवण्यासाठी संपूर्ण शहरवासी व भारतीय जनता पार्टी सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...



### लेखक माळी साहित्यभूषण पुरस्काराने सन्मानित

**लोहारा, दि.१७ मे -**

सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील विडनी शहरामध्ये मध्ये शुक्रवार दिनांक १६ मे २०२५ रोजी तेरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सोहळा नुकतेच पार पडले असून या संमेलनात साहित्यभूषण पुरस्कार लोहारा हायस्कुल शाळेचे माजी शिक्षक तथा साहित्यिक लेखक बाबुराव पिराजी माळी यांना देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास धुमाळ मुंबई यांच्यासह आदी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. मराठी साहित्य मंडळ या प्रख्यात संस्थेतर्फे फलटण शहरामध्ये शुक्रवार दिनांक १६ मे २०२५ रोजी तेरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. त्या निमित्ताने राज्यस्तरीय पुरस्कारासाठी आवाहन करण्यात आले होते त्यामध्ये साहित्य भूषण, विद्या भूषण, कला भूषण, समाजभूषण, पत्रकार भूषण आदी पुरस्काराने पुरस्कार कर्त्यांना गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल माळी यांचे लोहारा तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे.



### डॉ.काझी धर्मपत्नीसह हजसाठी रवाना

**वाशी, दि.१७ मे -**

वाशी येथील प्रसिद्ध वैद्यकीय सेवा देणारे व समाजकार्यात अग्रस्थानी असलेले डॉ.नियाजोद्दीन फैजुद्दीन काझी व त्यांच्या धर्मपत्नी डॉ.सौ.फिरोजा नियाजोद्दीन काझी हे दांपत्य पवित्र हज यात्रेसाठी मक्का-मदीना येथे रवाना झाले आहेत. याप्रसंगी तालुक्यातील सर्व धर्मीय नागरिक, नातेवाईक व ग्रामस्थांनी त्यांना शुभेच्छांचा वर्षाव केला. रुग्णसेवा, सामाजिक भान आणि धार्मिक कार्य यामुळे त्यांना संपूर्ण भागात सन्मानाने पाहिले जाते. कार्यक्रमास डॉ. दत्तात्रय कवडे, अक्का उद्योग समूहाचे सर्वेसर्वा किशोर बबन माने, ज्येष्ठ पत्रकार बळीराम जगताप, काझी शहाबाज, शकील पाटवेकर, बाबा कुरेशी, मयू काझी यांच्यासह हिंदू-मुस्लिम समाजातील विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. काझी, पटवेकर, तांबोळी, आतार, शेख मणियार, पठाण, मुजावर, कुरेशी, चेडे, कवडे, माने, जगताप, उंदरे, भांडवले, नाईकवाडी, देशमुख आदी परिवारांनी एकत्र येऊन सदिच्छा व्यक्त केल्या.



### हज यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंचा सत्कार

**तुळजापूर, दि.१७ मे -**

मौलाना बशीर शेख, जुबेर काझी व नबी शेख हे हज यात्रेला जाणार असून, त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येऊन शुभेच्छा देण्यात आल्या. तुळजापूर शहरातून दि.१७ रोजी हज यात्रेला रवाना झालले मौलाना बशीर शेख, जुबेर काझी व नबी शेख यांचा युवा नेते रणजीत इंगळे आणि युसूफ शेख यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बाबा इंगळे, हाजी जावेद बागवान, हाजी रसुल बागवान, हाजी हज्जुभाई आतार, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष तोफीक शेख, गुलाबसाब तांबोळी, मतीन बागवान, आझाद बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष मोहसिन बागवान, अभियंता रियाज शेख, रईस सिद्धीकी, पत्रकार अमीर शेख, राष्ट्रवादी काँग्रेस शहर उपाध्यक्ष मकसूद शेख, आरिफ बागवान, जफर शेख, आयाज पठाण, आशपाक सय्यद, रज्जाक पटेल, संदीप कदम, पिंटु अणदुरकर, श्रीकांत रसाळ, नाना पांढरे यांचेसह कै.विश्वास(काका) इंगळे विचार मंच व जवाहर तरुण मंडळाचे पदाधिकारी आणि सदस्यांनी तिघांना शुभेच्छा दिल्या.



### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.१७ मे -**

महाराष्ट्र राज्याच्या बोर्ड परीक्षेमधील इयत्ता दहावीमध्ये उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार येथील छत्रपती शिवाजी नगरच्या वतीने करण्यात आला. यामध्ये श्रुती हरिदास मदने, प्रतीक्षा कैलास जमादार, ग्रंथराज शिवशंकर भारती या विद्यार्थ्यांचा सत्कार शाल बुक्के आणि श्रीफळ मान्यवरांच्या हस्ते देऊन करण्यात आला. यावेळी प्रभावती भारती, मीरा घोंगते, कल्पना भारती, मीना नरवडे, रेश्मा जमादार, बाबा घोंगते, शिवशंकर भारती, नागेश नरवडे, कैलास जमादार, हरिदास मदने, रोहन नरवडे, दादा भारती, निलेश नरवडे, संकेत मदने यांची उपस्थिती होती.

## पावसाळा तोंडावर तरी महावितरण झोपेत!

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ मे -**



पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला असतानाही महावितरणकडून आवश्यक सुरक्षात्मक पूर्वतयारी अद्याप पूर्ण झालेली नाही. ढासळलेली वीजवाहिनी, झुकलेले विद्युत खांब, उघड्यावरचे ट्रान्सफॉर्मर, आणि झाडांच्या फांद्यांनी झाकलेल्या वीज तारांमुळे नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत महावितरणची वसुली मोहीम मात्र जोमात सुरू असून, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाची लाट उसळली आहे.

गेल्या वर्षी वादळी वाऱ्यामुळे आणि जोरदार पावसामुळे विजेच्या तारांवर झाडांच्या फांद्या कोसळून उमरगा शहराचा वीजपुरवठा पूर्णतः खंडित झाला होता. अनेक ठिकाणी अपघातही झाले होते. या पार्श्वभूमीवर यावर्षी वेळीच दुरुस्ती आणि देखभाल करण्याचे आश्वासन महावितरणकडून देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल दिसून येत नाही.

अजूनही विद्युत खांब झुकलेलेच आहेत, डीपी बॉक्स उघडे आहेत, आणि वीज तारांना लागलेल्या झाडांच्या फांद्या छाटण्यात आलेल्या नाहीत.

ग्रामीण भागातील शेतकरी तसेच शहरी भागातील ग्राहक महावितरणच्या या दिरंगाईमुळे त्रस्त झाले आहेत.

महावितरणकडून सेवा नाही, पण वसुली मात्र भरभरून! सध्या थकित वीज बिलांची वसुली अतिशय आक्रमक पद्धतीने केली जात आहे. शेतकऱ्यांचे वीजपंप बंद केले जात आहेत, घरगुती कनेक्शनवरही गंडांतर येत आहे. कोणतीही दयामाया न ठेवता थेट वीज पुरवठा खंडित केला जात आहे.

नागरिकांचे आणखी एक मोठे गाऱ्हाणे म्हणजे - फोन तरी उचला साहेब! वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर महावितरणच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचा नागरिकांचा प्रयत्न अपयशी ठरतो. फोन सतत व्यस्त राहतो किंवा उचललाच जात नाही. परिणामी नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागते.

पावसाळ्याच्या उंबरठ्यावर उभं असतानाही महावितरणची झोप अजूनही उडालेली नाही. प्रशासनाने वेळीच लक्ष घालून उपाययोजना न केल्यास, जनतेचा रोषास सामोरे जावे लागणार आहे.

> उमरगा शहर व परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून वीजपुरवठ्याची समस्या आहे. जग चंद्रावर गेले, मंगळावर पोहोचले, पण उमरग्यातील लोक अजूनही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. हे अपयश सर्वपक्षीय नेतृत्वाचे आहे. त्यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री, आमदार, खासदार तसेच एमएसईबी अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी केली. अन्यथा नागरिकांना एकत्र येऊन रुमणे घेऊन मोर्चा काढावा लागेल, असा इशाराही दिला.
>
> **- ॲड.शीतल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते.**

> सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि विद्यार्थी अक्षरशः विजेच्या धोक्यात जीवन जगत आहेत. सुरक्षिततेची कामं पूर्ण न करता केवळ वसुलीवर भर दिला जातो आहे. महावितरणने तातडीने पावसाळ्यापूर्वीची कामे पूर्ण करावीत, अन्यथा संभाव्य दुर्घटनांसाठी जबाबदार कोण? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.
>
> **- बाळासाहेब माने, युवक जिल्हाध्यक्ष, छावा संघटना**

## उघड्या डिग्गीच्या पत्र्याने घेतला तरुणाचा बळी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१७ मे -**

भूम तालुक्यातील ईट गावात शुक्रवारी रात्री एक अत्यंत दुर्दैवी आणि धक्कादायक अपघात घडला. भरधाव वेगात असलेल्या एका खाजगी ट्रॅव्हल्सच्या उघड्या डिग्गीचा पत्रा लागून १९ वर्षीय प्रवीण शिवाजी भोसले या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. त्याचा मित्र विशाल आप्पा भोसले गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

आक्का ट्रॅव्हल्सची एमएच ०१ सीआर ८१५४ क्रमांकाची बस शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजता वाशी येथून पुण्याच्या दिशेने निघाली होती. ईट गावाजवळून जात असताना, ही बस भरधाव वेगात होती व तिच्या मागील डिग्गीचा पत्रा उघडा होता. याच वेळी प्रवीण भोसले आणि विशाल भोसले हे दोघे मोटरसायकलवरून शेताकडे जात होते. अचानक ट्रॅव्हल्स समोर आल्याने विशालने प्रसंगावधान राखत मान खाली घातली, त्यामुळे तो बचावला. मात्र, मागे बसलेला प्रवीण डिग्गीच्या उघड्या पत्र्याच्या तीव्र आघातामुळे गंभीर जखमी झाला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा मिळावा; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ मे -**

नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा मिळावा, तसेच शहरी भागातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा, या प्रमुख मागण्यांसह इतर नागरी व शेतीविषयक समस्यांबाबत माजी उपनगराध्यक्ष इमाम शेख यांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना निवेदन सादर केले आहे.


दि. १६ मे रोजी नळदुर्ग नगरपालिका कार्यालयात आमदार राणा पाटील यांच्या उपस्थितीत नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान इमाम शेख यांनी नळदुर्ग शहर व परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या मांडल्या. ऐतिहासिक व लोकवस्तीयुक्त असलेल्या नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा देण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्याची मागणी आमदारांकडे केली. तसेच, नळदुर्ग शहरी हद्दीतील शेतकऱ्यांना सुद्धा ग्रामीण भागासारखे शासकीय योजनेचे लाभ मिळावेत, अशीही मागणी केली. विशेषतः १००% विहीर अनुदान, शेततळे, कुंपण, कोपरा, महात्मा गांधी रोजगार हमी योजना आणि पंतप्रधान आवास योजनेचा लाभ वस्तीवरील शेतकऱ्यांपर्यंत पोहचवावा, अशी मागणी त्यांनी केली. येडोळा ए.जी. वरून शहरी भागातील शेतकऱ्यांना २४ तास सिंगल फेज वीज उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी करताना इमाम शेख यांनी वस्तीवरील शेतकऱ्यांना वीज मिळण्यात येणाऱ्या अडचणींवरही प्रकाश टाकला.

तसेच उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना नीटसे आरोग्यसेवा मिळत नसल्याचे सांगत आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करण्याची मागणी त्यांनी केली. शहरातील शास्त्री चौक ते किल्ला गेट आणि चावडी चौक ते मिरवणूक मार्ग किल्ला गेटपर्यंतच्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. या मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण, गटार बांधकाम व आवश्यक नागरी सुविधा पूर्ण करण्यात याव्यात, यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनात केली आहे. शासनाच्या अनेक योजना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना लागू होतात, मात्र शहरी भागातील शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ मिळत नाही. या सर्व मागण्यांचे निवेदन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सकारात्मकपणे स्वीकारले असून, योग्य त्या पातळीवर पाठपुरावा करून समस्या सोडविण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

## अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१७ मे -**

वाशी येथील थोबडे विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दि.१९ मे ते २५ मे या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे थोर धार्मिक वातावरणात आयोजन करण्यात आले आहे.



या सोहळ्याचे आयोजन संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे वंशज सद्गुरु सोमान काका महाराज देहूकर व माऊली महाराज देहूकर यांच्या कृपाशीर्वादाने तसेच ह.भ.प. सातप्पा महाराज थोबडे व एकनाथ महाराज थोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. या सप्ताहामध्ये दररोज पहाटे ४ ते ६ काकड आरती, ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, ५ ते ६ प्रवचन, ६ ते ८ हरिपाठ, रात्री ८.३० ते १०.३० संकीर्तन व नंतर हरिजागर होणार आहे. प्रवचनासाठी ह.भ.प. मोहिते (घोडकी), शिदानंद महाराज (काळजे, सोलापूर), बडोपंत महाराज (कोरे), व शंकर महाराज थोबडे हे उपस्थित राहणार आहेत.

सांप्रतिक संकीर्तनासाठी नवनाथ गोडगे महाराज (पंढरपूर), श्री गुरु बाळासाहेब, ज्ञानेश्वर माऊली देहूकर महाराज (पंढरपूर) यांचे संकीर्तन होणार आहे. विविध गावांतील भजनी मंडळे हरिजागर सादर करणार आहेत. रविवार, २५ मे रोजी सकाळी ९ ते ११ काल्याचे कीर्तन व त्यानंतर सतीश जगताप व भाऊसाहेब माळी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन आहे. अन्नदान व नाश्त्याची व्यवस्था विविध भक्तांच्या वतीने करण्यात आली आहे. सर्व भाविक भक्तांनी या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ह.भ.प. शंकर महाराज थोबडे यांनी केले आहे.

## विना परवाना २० टन रासायनिक खत जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मे -**

वाशी तालुक्यातील एका कुक्कुटपालन शेडमध्ये अवैधपणे साठवून ठेवण्यात आलेल्या रासायनिक खतांच्या साठ्यावर जिल्हा कृषी विभाग आणि पोलिसांच्या संयुक्त भरारी पथकाने मोठी कारवाई करत सुमारे २० टन वजनाचे ४५६ पोते रासायनिक खत जप्त केले.

याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, एकूण ४.६१ लाख रुपये किमतीचा साठा ताब्यात घेण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, कृषि संचालक (निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण) सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक लातूर विभाग साहेबराव दिवेकर, मुख्य गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक प्रवीण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने आणि कृषी विकास अधिकारी प्रमोद राठोड यांनी सखोल नियोजन केले होते.

भरारी पथकाने केलेल्या तपासणीत वाशी तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या कुक्कुटपालन शेडमध्ये मोठ्या प्रमाणात रासायनिक खताचा विनापरवाना साठा आढळून आला.

साठ्यातील ४५६ पोत्यांचे वजन एकूण २० मेट्रिक टन असून, त्याची अंदाजित किंमत ४.६१ लाख रुपये आहे. सदरील घटनेनंतर शासकीय पातळीवर तात्काळ कारवाई करत संबंधित साठा जप्त करण्यात आला व वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

या कारवाईची फिर्याद तालुका कृषी अधिकारी वाशी राजाराम बर्वे यांनी दाखल केली आहे. मोहिमेमध्ये जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक डी. ए. गरगडे, कृषी अधिकारी प्रवीण पाटील (पंचायत समिती, वाशी), विस्तार अधिकारी श्रीकांत साळवे, तसेच कृषी विभागातील गायकवाड व साखरे यांनी सहभाग घेतला.

## केंद्र, राज्य सरकारच्या समाजाभिमुख योजना तळागळापर्यंत पोहचविण्याबरोबर पक्षसंघटन मजबूत करणार : दत्ता कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मे -**

केंद्र, राज्य सरकारच्या समाजाभिमुख असणाऱ्या कल्याणकारी योजना तळागळापर्यंत पोहचविण्यासोबत जिल्ह्यातील पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत भारतीय जनता पार्टीचे नूतन जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केले.

यावेळी माजी जि.प.अध्यक्ष नेताजी काळे, सौ.अस्मिता कांबळे, ॲड.नितीन भोसले, बालाजी कोरे आदी उपस्थित होते.



यावेळी कुलकर्णी म्हणाले, २०१६ ते २०२० या काळात जिल्हाध्यक्ष पदावर काम केले आहे. आता पक्षाने पुन्हा ही जबाबदारी सोपवली आहे. आगामी काळात संघटनात्मक काम काज अधिक बळकट करून, प्रत्येक कार्यकर्त्यांस न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे. यापूर्वी जिल्हाध्यक्ष पदावर असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका झाल्या होत्या. त्यामध्ये यश मिळाले होते.

केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार आहे. धाराशिवात आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, बसवराज पाटील असे सक्षम नेते पक्षासोबत आहेत.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली संघटन मजबूत करणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांची बूथ स्तरावरील बांधणी व संपर्क अभियानाच्या माध्यमातून कार्य विस्तार करण्यावर भर राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## लोहारा-उमरगा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी मदतीचा मार्ग मोकळा

### अनिल जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मे -**

गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या लोहारा व उमरगा तालुक्यातील सुमारे ८० हजार शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. शेतकऱ्यांना ८६ कोटी ४६ लाख रुपयांच्या मदतीचा शासन निर्णय लवकरच जाहीर होणार असल्याची शक्यता असून, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळताना दिसत आहे.



अनिल जगताप यांनी आज मंत्रालय, मुंबई येथे मदत व पुनर्वसन विभागाचे सहसचिव कैलास गायकवाड यांची दुसऱ्यांदा भेट घेऊन रखडलेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा केली. याआधी ७ एप्रिल रोजीही त्यांनी गायकवाड यांची भेट घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयाकडून आलेल्या प्रस्तावातील त्रुटींबाबत चर्चा केली होती. त्यावेळी प्रस्ताव अपुरा असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.

यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयाकडून २८ ऑक्टोबर २०२५ रोजी सविस्तर प्रस्ताव मंत्रालयात पाठवण्यात आला. या प्रस्तावाची प्रत मिळताच अनिल जगताप तातडीने मंत्रालयात दाखल झाले आणि ती प्रत सहसचिव गायकवाड यांच्याकडे सुपूर्त केली. यानंतर गायकवाड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ बोलावून घेऊन, या महिन्याच्या अखेरीस शासन निर्णय जाहीर करण्याचे आश्वासन दिले.

गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात उशिराने आलेल्या मुसळधार पावसामुळे लोहारा व उमरगा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले होते.

१५ ऑक्टोबर २०२४ रोजी धाराशिव जिल्हा प्रशासनाने विभागीय आयुक्त कार्यालयाकडे मदतीचा प्रस्ताव पाठवला होता. मात्र, २८ फेब्रुवारी आणि १२ मार्च २०२५ रोजी निघालेल्या शासन निर्णयामध्ये या दोन्ही तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता.

यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. २९ एप्रिल रोजी अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली लोहारा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलनही करण्यात आले. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष सुरू ठेवत अनिल जगताप यांनी १५ मे रोजी पुन्हा एकदा मंत्रालय गाठून सहसचिव कैलास गायकवाड यांची भेट घेतली आणि प्रस्तावासंदर्भातील सर्व बाबी समोर मांडल्या.

कोणतेही राजकीय पद नसतानाही अनिल जगताप यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा दिला. त्यांच्या प्रामाणिक आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांना आता यश मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

शासन निर्णय लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती असून, त्यामुळे लोहारा व उमरगा तालुक्यातील बळीराजाला दिलासा मिळेल, अशी आशा निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांने अनिल जगताप यांच्या संघर्षाचे कौतुक करत त्यांचे आभार मानले आहेत.

### टि.सी हरवली आहे

कु.सुमोद प्रवीण पाटील, वय वर्ष १९ रा.कदेर ता.उमरगा या विद्यार्थ्याचे १० पासची टी.सी.व काही महत्वाचे कागदपत्रे उमरगा ते लातूर प्रवास दरम्यान हरवली आहेत. तरी कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **पत्ता:** मु.पो. कदेर ता. उमरगा. जि. धाराशिव मो.९३७०६८०६१३

www.tarunbharat.net
रविवार, दि. १८ मे २०२५
तरुण भारत
छोटे उस्ताद

## तुम्हाला माहिती आहे का?

● एक वडाचे किंवा पिंपळाचे मोठे झाडं एका हंगामासाठी एक कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते आणि ते ही पन्नास फुटांपेक्षाही खाली! वडपिंपळाची मुळं पाषाणालाही भेदून ८०० ते १००० फुटावर पोचतात. एक कोटी लिटर म्हणजे एका विहिरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढे पाणी! याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो. म्हणून शेताच्या शेजारी मोकळी किंवा पडीक जागा असेल तर असे महावृक्ष आवर्जून लावावेत.

## अशी पाखरे येती

**निशिकांत मायी** / ९८८११५२४३९

# वेगवान अबाबील



इस्लाम धर्मग्रंथांमध्ये ज्या पक्ष्याचा उल्लेख आलेला आहे, असा चमत्कारीक अबाबील नावाचा पक्षी एक अद्वितीय आणि आकर्षक पक्षी असून त्याच्या उडण्याच्या क्षमतेमुळे आणि विशेष वर्तनामुळे तो ख्यातिप्राप्त ठरला आहे. अबाबील पक्ष्याला स्वेल्लो असेही म्हणतात. मराठीत मात्र अबाबील नावानेच तो ओळखला जातो. अबाबील प्रचंड वेगाने उडतात. त्यांना थकवा अजिबात येत नाही. मुळात त्यांची उडण्याची क्षमताही जास्त वेळाची असते आणि या विशेषतेसाठीच ते प्रसिद्ध आहेत. एकही क्षणही कुठेच न थांबता अबाबील ताशी ४०च्या वेगाने उडतात. दिवसभरात तब्बल ३०० किलोमीटरपर्यंत प्रवास करण्याची त्यांची तयारी आणि क्षमता असते. उडता उडताच हवेतील किडे, मधमाशा, पतंग आणि इतर किडे वगैरेंना आपले खाद्य बनवतात. पाणी पिण्यासाठी फक्त हे पक्षी जमिनीवर उतरतात. अबाबील अर्थात स्वॅलो बर्डचे घरटे मातीचे असते. नदी, तलाव किंवा जलाशयाच्या जवळ आपले


***अबाबील प्रचंड वेगाने उडतात. त्यांना थकवा अजिबात येत नाही. मुळात त्यांची उडण्याची क्षमताही जास्त वेळाची असते आणि या विशेषतेसाठीच ते प्रसिद्ध आहेत. एकही क्षणही कुठेच न थांबता अबाबील ताशी ४०च्या वेगाने उडतात. दिवसभरात तब्बल ३०० किलोमीटरपर्यंत प्रवास करण्याची त्यांची तयारी आणि क्षमता असते.***

घरटे चोचीच्या मदतीने बांधतात. संध्याकाळी ते आपल्या घरट्यात परततात आणि सकाळी पुन्हा उडण्यासाठी सज्ज होतात. त्यांचे हे घरटे इतके अप्रतिम असते की, पक्षिमित्र या घरट्यांकडेच आकर्षित झाल्याखेरीज राहात नाहीत. लहान घागरीच्या आकाराचे ते घरटे असते. अबाबील पक्षी साधारणपणे समूहाने राहणे पसंत करतात. कळपाने उडत राहणे हा या पक्ष्यांचा छंद असून, केवळ प्रजनन हंगामासाठी ते आपली तयार करतात.

काही धार्मिक कथांमध्ये अबाबील हे जादुई आणि चमत्कारी पक्षी असल्याचे मानले गेले आहेत. काळ्या रंगाच्या अबाबीलच्या मानेखाली पांढरा आणि डोक्याच्या वरच्या बाजूला गडद भगवा रंग असतो. भारतासह युरोपातही या पक्ष्यांचे आढळस्थान दिसून आल्याची नोंद आहे. काही पक्षी चिखलातदेखील घरटे बांधून राहतात. सुमारे २५ ग्रॅम वजनाच्या अबाबील पक्ष्यांचे आयुष्य साधारणपणे तीन वर्षांपर्यंत असते.

## Word Puzzle

Complete the word with the help of pictures




Previous Word Puzzle Answer :
● Jupiter ● Neptune ● Venus ● Earth ● Uranus ● Mercury ● Mars ● Saturn

## म्हणीत गुंतली म्हण.....!

सोबतच्या चौकोनात एकंदर सात म्हणी / वाक्प्रचार उभे, आडवे आणि तिरप्या स्वरूपात लिहिले आहेत शोधू शकाल तुम्ही !

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हा | शे | रा | स | स | व्वा | शे | र |
| छे | ता | टे | उ | म | स्ता | का | दृ |
| ल | द | व | न | छे | ळी | टे | ष्टी |
| उ | गा | मा | र | ज | स्ता | द | आ |
| छे | र | म | थ | तु | टे | उ | ड |
| णे | स्ता | रा | घा | द | री | छे | सृ |
| टे | र | उ | स्ता | ल | द | दे | ष्टी |
| णे | री | ओ | ढ | णे | णे | | णे |

(उत्तर पुढील अंकी)

—: मागील अंकातील शब्द अंत्याक्षरीचे उत्तर : —
1) श्रीगणेशा 2) शासन 3) नकुल 4) लवचीक 5) कदंब 6) बकाल 7) लवंग 8) गहन 9) नर्तक 10) कमाल 11) ललित 12) तमाशा 13) शालक 14) कपास 15) सवंग 16) गवत

## पंख लावू या स्वप्नांना...

**श्रध्दा सुदामे**/ ८८३०७८४१०३

# रेसमध्ये धावणे कसे टाळावे ?

**भाग - २**

अनेक पालक, विद्यार्थी विचारतात की, रेसमध्ये धावणे कसे टाळता येईल? त्याचे उत्तर

विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी अजून एक पर्याय आहे. ज्या विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग करायचे आहे पण, मार्कांच्या स्पर्धेत भाग घ्यायचा नाही ते विद्यार्थी दहावीनंतर तीन वर्षांत पॉलिटेक्निक इंजिनिअरिंग (डिप्लोमा) करून सेकंड इयर इंजिनिअरिंगला डायरेक्ट ॲडमिशन घेऊ शकतात. आज पुढे बघू बारावी सायन्स, कॉमर्स, आर्टस् नंतर करिअर क्षेत्र निवड कशी करावी.

**१)लॉ : (कायदेविषयक सल्लागार, वकील, न्यायाधीश)या क्षेत्रांसाठी**

- एल.एल.बी. ही डिग्री प्राप्त करणे आवश्यक आहे. हा तीन वर्षांचा अभ्यासक्रम आहे. सी.इ.टी. ही लॉसाठीची राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा राज्यानुसार वेगवेगळी द्यावी लागते आणि नॅशनल कॉलेजेससाठी प्रवेश पात्रता (क्लॅट)च्या परीक्षेतील गुण ठरवतात.

- बी.बी.ए.एल.एल.बी. (बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि बॅचलर ऑफ लेजिस्लेटिव्ह लॉ )(ऑनर्स)हा बारावीनंतर पाच वर्षांचा अभ्यासक्रम आहे.

- बी.ए.एल.एल.बी- हा अभ्यासक्रमदेखील याच वर्षांत पूर्ण होतो.

**लॉनंतर पुढे काय?**

अ) एल.एल.एम.- लॉची वरीलपैकी कुठलीही पदवी घेतल्यानंतर पोस्ट ग्रॅज्युएशन करून ही पदवी घेता येते.

ब) सी.एस. म्हणजे कंपनी सेक्रेटरी- लॉनंतर करता येईल.

क) चार्टर्ड अकाउंटंट म्हणजे सी.ए.

२) डिझाईन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता खालीलपैकी एक स्पर्धा परीक्षा देणं आवश्यक आहे.

- एन.आय.एफ.टी., - एन.आय.डी.डी.ए.टी

- यू.सीड , - सी.यू.इ.टी.

**३) जर्नालिझम अथवा पत्रकारिता :** बारावीनंतर मिडिया आणि मास कम्युनिकेशनची पदवी घेतल्यानंतर बातमी निवेदन, संपादक, रिपोर्टर म्हणून वृत्तपत्र अथवा दूरदर्शनमध्ये करियर क्षेत्र निवडता येते.

**बारावी आर्टस्नंतर हे अभ्याक्रम**

**१)इंडॉलॉजिस्ट :** इंडॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेऊन आर्किऑलॉजिस्ट, इतिहासकार अशा करिअर क्षेत्रात झेप घेता येते आणि संस्कृती जतन करू शकतो.

२) फॉरेन लँग्वेज : जर्मन, फ्रेंचसारख्या भाषा शिकून लँग्वेज ट्रान्सलेटर म्हणून करिअर परकीय खात्यात करता येते.

**३) सायकॉलॉजिस्ट :** सायकॉलॉजी विषय घेऊन बारावीनंतर बॅचलर डिग्री आणि त्यानंतर पोस्ट ग्रॅज्युएशन करून या क्षेत्रात करियर करता येते.

**बारावी कॉमर्स अथवा वाणिज्यनंतर -**

१) बी.कॉम. - ग्रॅज्युएशन करताना अर्थशास्त्रासारखे विषय घेऊन फायनान्समध्ये एम.बी.ए. करता येते.

**'आऊट ऑफ बॉक्स' अशा करियरच्या दिशा :**

१) हॉटेल मॅनेजमेंट : बारावीनंतर ही डिग्री घेऊन विद्यार्थी शेफ म्हणून, मॅनेजर म्हणून नोकरी अथवा स्वतःचा व्यवसाय करू शकतो.

२) वाइल्ड लाइफ फोटोग्राफी

३) भूगर्भ शास्त्र, ४) खगोल शास्त्र

५) फॅशन डिझायनिंग

६) अभिनय, नाट्य, नृत्य, संगीत विषयामध्ये पदवी

७) लायब्ररी सायन्समध्ये पदवी

८)फिजिकल एज्युकेशन (बी.पी.एड.)

महत्त्वपूर्ण सल्ला सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए.आय.) चे वाढते वर्चस्व बघता विद्यार्थ्यांनी करियरचे असे क्षेत्र निवडावे, ज्याची जागा भविष्यात ए.आय. घेणार नाही.

## प्रश्नसंच - १३



तरुण भारतचा अभिनव उपक्रम

# ज्ञानांजली!

**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारित १० प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखित स्वरूपात तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा. जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

**श्रीगजानन विजय ग्रंथाच्या आधारे सत्य की असत्य लिहा.**

**१) चंदनाचा शेजार । असला थोडा बहुत हिवर ॥ वासित होतो साचार । हा न्याय निसर्गाचा ॥**
अ) सत्य ब) असत्य

**२) शके अठराशे छत्तीसमध्ये महाराजांनी समाधी घेतली.**
अ) सत्य ब) असत्य

**३) याचा करी विचार। संकट आल्या कोणावर। सगळे साह्य करणार। एका ईश्वरावाचुनी॥**
अ) सत्य ब) असत्य

**४) यामध्ये न काही सार । धन भू चे भूमिवर॥ येते मात्र बरोबर । पाप पुण्य मानवाच्या ॥**
अ) सत्य ब) असत्य

**५) कां की हा येथे स्थिर। आहे मृडानिपती कर्पूरगौर। ज्याच्या कृपेने रावण । जगी झाला धनपती ॥**
अ) सत्य ब) असत्य

**६) शाश्वताचे पोषण । केले अशाश्वता विसरून । त्या कर्माची तुज लागून । फळे भोगणे भाग असे ।**
अ) सत्य ब) असत्य

**७) जे दुःखाचे वाटे स्थान । तेच सुखाचे निकेतन । संपून गेल्यावरी धन । सहज होते न्याय हा ॥**
अ) सत्य ब) असत्य

**८) आय पाहून खर्च करी । दंभाचार कधी न वरी । साधुसंत येता घरी । विन्मुख त्याला लावू नये ॥**
अ) सत्य ब) असत्य

**९) न जाळे वैश्वानर । केव्हाही खऱ्या संताला ॥**
अ) सत्य ब) असत्य

**१०) गोगलगाय शेप किडा । हिमालया न देईल वेढा । सागरीचा सिंप किडा। मेरू पर्वता न जाय कधी ॥**
अ) सत्य ब) असत्य

### प्रश्नसंच क्र. १२ चे भाग्यवान विजेते

एकुण ५२५ जणांनी उत्तरे दिलीत. त्यापैकी खालील भक्तांनी पैकीच्या पैकी गुण प्राप्त केलेत. सुषमा तारे, सुचितस कुळकर्णी, मीनाक्षी, रेखा सराफ, अर्पिता साधले, तृष्णा लोडेकर, सुप्रिया काकडे, पूनम पाटील, संगीता पाटील, देवश्री बिडवाई, सुवर्णा गोखले, कालिंदी गलगलकर, अंजली भानेगावकर, मनिषा लिगदे, संध्या चावडीपांडे, आरती दफ्तरी, सुनील महानाग, स्वप्नील कुळकर्णी, भाग्यश्री शर्मा, किशोर निकस, वैष्णवी नाईक, उर्मिला तिवारी, मानसी बोरडकर, शोभा भोळे, दिपाली वऱ्हाडपांडे,अंजली कानडे, प्रवीण कोदंडे, ऋतुजा तांबेकर, नारायण तायडे, संजय काळे, रोहिणी केळकर, संज्योत कुलकर्णी, निलिमा दामले, अमिता दहिवदकर, मेघा कुळकर्णी, आशिष कोकर्डेकर, जयश्री एतावडेकर, सुनिता सोनारे, सीमा निवसरकर, मनोहर पाटील, कल्पना साखरकर, राजेश अवधुतवार, अभिलाषा कमानकर, दिपाली मंडलिक, मयंती पवार, पी. तेरखेडकर, क्षमा डोरले, निशा कोटगिरे

**मागच्या ज्ञानांजलीतील प्रश्नावलीची उत्तरे!**

१) परमार्थाचा, २) लेकरांचे ३) कमल, ४) संतांचे, ५) निशा, ६) गण गण, ७) सोने, ८) श्रीफलाचा, ९) नारायण, १०) निंबतरुच्या

# बीज अंकुरे अंकुरे...

बीज अंकुरणं...हे अंकुर म्हणजे नवनिर्मितीचं शुभचिन्ह ! नवी सुरुवात करण्याचे प्रतिक! शताब्दीवर्षात दाखल झालेला तरुण भारतसुद्धा अशीच नवीन सुरुवात करतोय. तरुण भारताच्या वतीने पर्यावरण रक्षण आणि संवर्धनासाठी 'बीज अंकुरे अंकुरे' हा उपक्रम सध्या आयोजित केला आहे. या उपक्रमात आपण सर्व वाचक मंडळींनी भरघोस सहकार्य दिलंय. येत्या ५ जूनपासून आता थेट तुमच्या घरी या मिश्र बिया पोहचणार आहेत.

मग त्यांची रोपं कशी बनवायची? ती लावायची कुठे? अशा अनेक शंका तुमच्या मनात असतील. चला तर... या शंकांचं निरसन करू या. सोबतच्या चित्रात दाखविलेल्या चिंच, चिचबिलाई, कवठ आणि सीताफळ या बिया तुमच्याकडे आलेल्या पाकिटात आहेत का? लहान कुंड्यांमध्ये किंवा दुधाच्या पाकिटात त्यांची रोपं बनवून तुम्ही घराच्या कुंपणाबाहेर, घराजवळच्या उद्यानात, रस्त्याच्या कडेला लावू शकता. कोणाला भेटीदाखल ही रोपटी देऊनही, पर्यावरण संवर्धन करता येईल.

**१. चिंच** : हिंदीत इमली आणि इंग्रजीत टॅमरिडस इंडिका नावाची आपली चिंच मूळ आफ्रिकेची आहे.



चिंचेचे झाड १०० फूटांपर्यंत वाढते. चिंच बहुतांश भारतीय पदार्थांमध्ये मुख्य घटक आहे. पदार्थांची लज्जत वाढविण्यासह कपड्यांना रंग देण्यासाठीही चिंचेचा वापर करतात. पचनक्रियेशी संबंधित आजारांवर चिंचेचा वापर औषध म्हणून केला जातो. शिवाय, मलेरिया, बुरशीनाशक, जंतुसंसर्गरोधक म्हणून चिंचेचा वापर केला जातो. मजबूत हाडं, नियंत्रित रक्तदाब आणि बळकट स्नायूंसाठी आवश्यक मँगनीज या खनिजाचा स्रोत म्हणजे चिंच!

**२. चिचबिलाई** : हिंदीमध्ये चिलबिल आणि



इंग्लिशमध्ये इंडियन एल्म म्हणतात. या झाडाची पानं, साल आणि फळांचे विविध औषधी उपयोग आहेत. पोटदुखी, अपचन, बद्धकोष्ठता आणि मधुमेहात चिचबिलाईचे आश्चर्यकारक उपयोग होतात. रक्तशुद्धी करण्यासोबतच रक्तात वाढ करणारी चिचबिलाई लठ्ठपणा कमी करण्यात लाभदायक आहे. नैसर्गिक रोगप्रतिकारशक्ती वाढविणारी चिचबिलाई छान मोठा वृक्ष होतो आणि त्याची सावलीसुद्धा थंडगार असते.

**३. कवठ** : इंग्रजीत वूड ॲपल आणि



संस्कृतमध्ये दधिफल म्हणून परिचित हे फळ मूळतः दक्षिण भारतातील आहे. काटेरी आणि पानझडी प्रकारचा हा वृक्ष भारतासह श्रीलंका, जावा, ब्रम्हदेश आणि बांग्लादेशात आढळतो. साधारण ९ मीटरपर्यंत उंच होणाऱ्या या वृक्षाची साल पांढरट हिरवी आणि काही खडबडीत असते. या फळांचा रंग हा करडा असतो आत मध्ये मृदू गर व लांबट बिया असतात. कवठाचे पिकलेले फळ चवीला आंबट-गोड व तुरट असते. त्याच्या गरापासून खाण्यासाठी चटणी, मुरंबा, जेली, बर्फी बनवतात. हे फळ पित्ताचे शमन करण्यास मदत करते व यामुळे भूक वाढते. कवठ कंठाची शुद्धी करते, दमा, क्षयरोग, रक्तविकार, उलटी, वातदोष, श्रम, उचकी, विष, तृष्णा, ग्लानी वगैरे तक्रारीत हितकर असते. या झाडापासून मिळणारे लाकूड मजबूत आणि टिकाऊ स्वरूपाचे असल्यामुळे घरबांधणीसाठी व शेतीचे अवजारे बनवण्यासाठी उपयोग केला जातो.

**४. सीताफळ** : सीताफळ हे उष्णकटिबंधीय अमेरिकेच्या आणि वेस्ट इंडीजच्या काही भागांमध्ये



आढळणारे झाड आहे. स्पॅनिश व्यापाऱ्यांनी हे झाड आशियामध्ये आणले. या फळाचे जुने मेक्सिकन नाव अता! हे अजूनही बंगाली व इतर भाषांमध्ये वापरतात. हे हिरव्या रंगाचे एक गोड फळ आहे. यात काळ्या रंगाच्या बिया असतात. फळावरचे डोळे चांगले मोठे झाले की कच्चे तोडून पिकायला ठेवतात. सीताफळातील व्हिटॅमिन सीचे उच्च प्रमाण पांढऱ्या रक्तपेशींचे उत्पादन वाढवून रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते, जे संक्रमणांशी लढण्यासाठी आवश्यक असतात. या फळांचे नियमित सेवन सर्दी आणि फ्लू सारख्या सामान्य आजारांची वारंवारता आणि तीव्रता कमी करण्यास मदत करू शकते.

# बंटीची बंडखोरी

**(भाग ५२)**

**प्रीती वडनेरकर** /९८२३९९४७९२



'यश, युग, स्वानंद, शिरीष, नंदू, चंदू सगळे इकडे या,' बंटीनं सोसायटीच्या ग्राऊंडवर सगळ्यांना हाक मारली. 'यस बॉस' म्हणत सारे बंटीजवळ गेले.'आज मी महत्वाच्या विषयावर तुमच्यांशी बोलणार आहे,' बंटी म्हणाला. 'म्हणजे एरवी सटरफटर, फालतू बोलत असतोस?' यशनं फिरकी घेतली.'बी सिरीयस यार...जोक नको! तर, शिरीषनं मला रमण विज्ञान केंद्राची एक जाहिरात दाखवली. 'बाल शास्त्रज्ञ स्पर्धा' अशी! पूर्ण भारतातल्या दहा ते बारा वर्षांच्या मुलांसाठी त्यांनी आयोजित केली आहे,' बंटी बोलत होता.

'मग काय, आपण १०-१२ वर्षांचे असल्याचे सांगून, आपण भाग घ्यायचा?' यश म्हणाला. त्यावर सारे खो खो हसले.'तुम्हाला माहित आहे, आपल्या वॉचमन दादांचा मुलगा ओंकार, खूप डोकेबाज आणि कुशल आहे. एवढ्याशा वयात त्यानं काय काय भारी वस्तू बनवल्या आहेत, म्हणून सांगू! मी गेलो होतो, त्याच्या घरी तेव्हा त्यानं दाखवल्या मला! तर मला वाटतं, आपण त्याच्याकडून फॉर्म भरून घेऊ आणि पाठवू, रमण विज्ञान केंद्रात!' बंटीनं सांगितलं. त्याच्या सुचनेचं सगळ्यांनी छान स्वागत केलं.

'वॉचमन दादा, आम्हाला सगळ्यांना वाटतंय. ओंकारनं स्पर्धेत भाग घ्यावा म्हणून! तुम्ही काळजी नका करू. आम्ही भरून घेऊ फॉर्म. शिवाय त्याला, नवीन शोध लावून एखादी वस्तू बनवायलासुद्धा मदत करू आम्ही,' बंटीनं सांगितलं.

'ओंकार, तुला काय वाटतं? तुला जमेल का नीट?' वॉचमन दादांनी ओंकारला विचारलं.

'हो, मला खूप आवडेल. शिवाय, बंटी दादा आणि त्याचा सगळा ग्रुप, मदत करणार असेल तर सोपं जाईल,' ओंकार म्हणाला.'ठरलं तर मग? चल ओंकार, आमच्या घरी जाऊ, फॉर्म भरायला,' बंटीच्या मागोमाग त्याचा ग्रुप आणि सर्वात मागे ओंकार असे त्याच्या घरी गेले. नाव, जन्म तारीख, शाळेचा दाखला, आधारकार्डची कॉपी, स्वतःचे फोटो... अशा बाकी साऱ्या बाबी भरता भरता ओंकारच्या अक्षरशः नाकी नऊ आले.

बंटी आणि ग्रुप त्याला मदत करत होतेच. ओंकारकडून त्यांना शिवधनुष्य पेलून घ्यायचे होते.

शाळेच्या मुख्याध्यापकांकडून,'ओंकार, आमच्या शाळेचा विद्यार्थी असून, त्याने स्पर्धेमध्ये भाग घेतल्यास, आमची हरकत नाही,'असे ना हरकत पत्र घ्यायचे शिल्लक होते. नुकताच बारावीचा निकाल लागला होता. ओंकारच्या शाळेला भरघोस यश मिळालं होतं. निरनिराळे पत्रकार, चॅनेलचे प्रतिनिधी, मुख्याध्यापक सरांची मुलाखत घ्यायला येत होते. त्यामुळे ओंकारसाठी वेळ देणं, त्यांना महत्त्वाचं वाटत नव्हतं. दोन-तीन दिवस अक्षरशः वाया गेले. स्पर्धेची तारीख जवळ जवळ येत होती. बंटी ग्रुपचा धीर सुटत चालला होता. ओंकारची काहीच तयारी नव्हती. शाळेतून पत्र मिळत नव्हतं. 'बंटी, आपण सगळे मिळून, मुख्याध्यापकांना भेटू...पाहू कसं देत नाहीत, सर्टिफिकेट ते,' यश म्हणाला.

'बरोबर आहे यश, असंच करावं लागेल. उद्या सकाळीच आपला मोर्चा शाळेवर नेऊ,' बंटीनं फर्मान काढलं. दुसऱ्या दिवशी सकाळी, मुख्याध्यापकांच्या ऑफिसच्या बाहेर, साऱ्यांनी ठिय्या मांडला. मुख्याध्यापक सर आले. आपल्या केबिनमध्ये स्थनापन्न झाले.

बंटी ग्रुप ओंकारला घेऊन सरळ आत घुसला. प्युननं आणि सरांच्या असिस्टंटनं त्यांना आडवायचा खूप प्रयत्न केला. 'सर, व्हेरी सॉरी! आम्ही परवानगी न घेता आत आलो. पण, कारणच तसं आहे सर!' बंटीनं सरांची क्षमा मागून, ओंकारबद्दल सर्व सांगितलं. ओंकारला बक्षिस मिळालं तर, शाळेचं नाव किती उंचीवर जाईल, हे सुद्धा पटवलं.

'फार कौतुकाची बाब आहे. आपल्या शाळेच्या लॅबची काही मदत लागल्यास अवश्य घे ओंकार! शिक्षकांची गरज लागत असल्यास तीसुद्धा घे. ऑल द बेस्ट!' म्हणून त्यांनी ताबडतोब सही, शिक्क्याचं पत्र बंटीच्या सुपूर्द केलं. ओंकारनं, सरांना वाकून नमस्कार केला. 'यशस्वी भव' त्यांनी आशिर्वाद दिला.

बंटीनं आपल्या घराच्या बाल्कनीतच ओंकारची प्रयोगशाळा सुरू केली. तहानभूक विसरून, ओंकारनं आपलं लक्ष, संशोधनावर केंद्रीत केलं. बऱ्याच वेळा त्याचं जेवण, नाश्ता बंटीकडेच होऊ लागला. 'ओंकार, तुझ्या डोक्यात काय विचार चालले आहेत, किंवा कसला प्रोजेक्ट करायचा विचार आहे, ते सारं तू या रजिस्टर नोटबुकमध्ये लिहित जा. त्याप्रमाणे डायग्रॅम... सॉरी आकृत्या काढत जा म्हणजे विसरायला नको,' बंटीनं सल्ला दिला.

बंटी आणि ग्रुप ओंकारभोवती कोंडाळं करून बसत असत. ओंकार नोटबुकावर काही आकृत्या काढू लागला की, सारे औत्सुक्यानं बघत रहात. 'बंटीच्या आई, तुम्ही आमच्या ओंकारला दत्तकच घेतलं या जणू! दिसभर तुमच्या त्या मेकॅनोसंग खेळत बसतो अन् तुम्ही कवत्यिक करता. फकस्त रातच्याला घरी येतो झोपायला.' ओंकारची आई, बंटीकडे येऊन, बंटीच्या आईला म्हणाली. 'शालूबाई, ओंकार एकदम चमकून जाईल. हुशार आहे तो! काही काळजी करू नका,' बंटीची आई म्हणाली. प्रोजेक्ट सबमिट करायचा दिवस जवळ येऊ लागला. बंटी ग्रुपचा जीव वरखाली होऊ लागला. ओंकार मात्र शांत होता.

अविमामाचा मेकॉनो, त्यातल्या धातूच्या पट्ट्या, तबकड्या, वेगवेगळे पुठ्ठे, बॅटरीचे सेल, सेलो टेप, वायर, कात्र्या अशा वस्तू त्याच्या हाताशी लागत असत. अहोरात्र कष्ट करून शेवटी ओंकारचं संशोधन तयार झालं. प्रोजेक्ट सबमिट करायला जेमतेम एकच दिवस उरला होता. बंटीनं ओंकारला मोठा जाड पेपर दिला. त्यावर त्याच्या प्रोजेक्टची आकृती काढायला सांगितली. त्याच्या मशिनरीजची माहिती लिहून त्यांचं कार्य कसं चालतं, हे वेगवेगळ्या आकृत्यांच्या आधारे समजवण्याचा प्रयत्न केला. शेवटी आपलं साध्य काय, यासंबंधीसुद्धा लिहावयास सांगितलं. बंटी ग्रुप, त्यांचे आईबाबा, साऱ्यांनी टाळ्या वाजवून त्याला शाब्बासकी दिली. रमण विज्ञान संस्थेच्या झोनल ऑफिसमध्ये ओंकार, बंटी, त्याचा ग्रुप, बंटीचे आईबाबा सारे पोहचले. ओंकारने आपलं प्रोजेक्ट, त्याच्या सर्व आकृत्या, त्याचे कार्य असे पेपर्स त्यांच्या हाती सोपविले. 'दहा दिवसात तुमच्या घरी, निकाल येईल. कुरियरनं पोहचेल आणि मोबाईल फोनवर मेसेज येईल. तुमचे प्रोजेक्ट निवडले गेले तर, दहा दिवसांनी नवी दिल्लीला जाऊन, तिथल्या रमण विज्ञान केंद्रात प्रोजेक्ट सादर करून प्रात्याक्षिक दाखवावे लागेल. त्यांना पसंत पडलं तरच त्यावर शिक्कामोर्तब होऊन, शिष्यवृत्ती तुम्हाला मिळू शकेल,' अधिकाऱ्यांनी सांगितलं.

ओंकार आणि ग्रुपच्या मनाला हुरहूर लागली, काय होते याची टोचणी लागली.

हा हा म्हणता म्हणता, दहा दिवस निघून गेले. अकराव्या दिवशी ओंकारच्या फोनवर मेसेज आला. 'तुमचा प्रोजेक्ट स्पर्धेसाठी निवडला गेला आहे. तुम्हाला अमुक तारखेला, नवी दिल्ली येथे, विज्ञान केंद्राच्या हॉलवर दुपारी तीन वाजता हजर रहावे लागेल. अभिनंदन!' पाठोपाठ कुरियरने त्यांचे त्याच मजकुराचे पत्रही आले.

बंटी ग्रुप ओंकारच्या भोवती रिंगण करून गरागरा नाचून आनंद व्यक्त करू लागला. बंटी, बंटीचे बाबा, आई आणि ओंकार यांचं दिल्लीच्या ट्रेनचं रिझर्वेशन केलं. ओंकारचा सारा खर्च बंटीच्या आईबाबांनी केला. ओंकारच्या आईबाबांनी त्याच्यासाठी नवे कपडे शिवले.

बंटीनं, ओंकारकडून त्याच्या प्रोजेक्टसंबंधी इंग्रजीमध्ये संपूर्ण निबंध लिहून घेतला. रोज त्याच्याकडून तयारी करवून घ्यायला सुरूवात केली. दिवस-रात्री सराव सुरू केला.

सारे दिल्लीला पोहचले. जेवणखाण करून, तयार होऊन सारे हॉलवर दाखल झाले. हॉल गच्च भरला होता. बंटीच्या बाबांनी पत्र दाखवले. सर्वांना पुढून चौथ्या रांगेत, राखीव जागेवर बसविले. भाषण आटोपल्यावर, एकेका स्पर्धकाला स्टेजवर बोलावण्यात आले. अशातच ओंकारचं नाव पुकारून, त्याचं प्रोजेक्ट त्याला देण्यात आलं. ओंकारनं इंग्रजी भाषेत बोलायला सुरूवात केली. काही केल्या त्याला शब्द आठवेना. काय करावं, ते न कळून तो स्तब्ध उभा राहिला.

'ओंकार SS व्हॉट इज युवर प्रोजेक्ट? प्लीज स्टार्ट...' ओंकार गोंधळला!

'ओंकार... सुरू कर! रिस्पेक्टेबल... सुरू कर,' बंटी स्टेजजवळ जाऊन म्हणाला. ओंकारला काही सुचेना. तो घाबरून उभाच राहिला. 'ओके गो नाऊ. बेटर लक नेक्स्ट टाईम. यू कॅन गो.' ओंकार आपलं प्रोजेक्ट घेऊन निघाला. 'थांब ओंकार, तिथेच थांब.' बंटी ओरडला. तो धावत स्टेजवर गेला. 'एक्सक्यूज मी प्लीज सर, ही इज व्हेरी वेल प्रिपेअर्ड. ओन्ली थिंग इज लॅन्वेज, इफ यू अलाऊ हिम टू एक्सप्लेन इन हिज मदरटंग, ही विल एक्सप्लेन व्हेरी वेल सर,' बंटीनं विनंती केली. परिक्षकांनी होकार दिला.

ओंकारनं मराठीत समजवायला सुरूवात केली. फटाफट सारे मेकॅनिझम समजावून, त्याने प्रात्यक्षिक करून दाखवले. एक परिक्षक मराठी होते. त्यांनी इतरांना इंग्रजीमध्ये समजावून सांगितले. टाळ्यांचा कडकडाट झाला. ओंकारच्या प्रोजेक्टनं स्पर्धा जिंकली होती. त्याला साऱ्या शिष्यवृत्ती मिळाल्या होत्या. ओंकारने कप घेताना, बंटीला स्टेजवर बोलावलं. कप उंच धरून, बंटीला हात लावायला सांगून फोटोसाठी पोज दिली. टाळ्या सुरूच होत्या.

# संपादकीय

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# पाकची अण्वस्त्रे आणि जागतिक समुदाय

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी पाकिस्तानजवळ असलेल्या अण्वस्त्रांबाबत जागतिक समुदायाजवळ चिंता व्यक्त केली आहे, ती स्वाभाविक म्हणावी लागेल. भारत आणि पाकिस्तान यांच्यात काही दिवसांपूर्वी युद्धाला तोंड फुटले होते. सुदैवाने तीन दिवसांतच हे युद्ध संपल्यामुळे भारतातील लोकांसोबत जगानेही सुटकेचा श्वास सोडला. कारण भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज देश आहेत आणि या युद्धात पाकिस्तानने भारतावर अणुबॉम्बने हल्ला करण्याची धमकी दिली होती. या छोट्या युद्धात भारताने पाकिस्तानला जबर मार दिला. पाकिस्तानात घुसून भारताने त्याची हवाईतळे उद्ध्वस्त केली. पाकिस्तानला त्याच्या घरात घुसून मारले. त्यामुळे पाकिस्तानला जगात तोंड दाखवायला जागा उरली नाही. आपल्या पराभवाने पाकिस्तान पिसाळला होता. पिसाळलेला कुत्रा ज्याप्रमाणे कोणालाही चावू शकतो, तसेच पिसाळलेला पाकिस्तान आपल्या पराभवामुळे काहीही करू शकत होता. अगदी अणुबॉम्बचा वापरही त्याने भारताविरुद्ध केला असता. दारू प्यायलेला मनुष्य काय करेल, याचा जसा अंदाज येत नाही, तसेच पाकिस्तान काय करेल, हे सांगणेही कठीण असते. पाकिस्तानच्या याच धमकीकडे राजनाथसिंह यांनी जगाचे लक्ष वेधत पाकिस्तानसारख्या बेजबाबदार आणि धूर्त देशाच्या हातात अण्वस्त्र सुरक्षित आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला. राजनाथसिंह यांनी व्यक्त केलेली चिंता ही फक्त भारताचीच नाही तर संपूर्ण जगाच्या दृष्टीने काळजीचा विषय म्हटला पाहिजे. पाकिस्तान हा माथेफिरू देश आहे. युद्धात आपला पराभव होत असल्याचे पाहून तो काहीही करू शकतो, अगदी अण्वस्त्रांचा वापरही करू शकतो. भारताने आपल्या प्रगतीसाठी आणि शांततेसाठी अणुबॉम्ब तयार केला आहे. भारत आण्विक ऊर्जेसाठी याचा प्रामुख्याने वापर करतो. भारताने कधीही आपल्याजवळ अणुबॉम्ब आहे आणि आम्ही याचा वापर करू, अशी धमकी दिली नाही. पाकिस्तानने मात्र भारताला धमकावण्यासाठी अणुबॉम्ब तयार केला आहे. नुसता तयारच केला नाही तर त्याचा फायदा उचलत तो भारताला अधूनमधून धमकावतही असतो. मात्र भारत त्याच्या अशा धमकावण्याला भीक घालत नाही, हा भाग वेगळा. यावेळीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाक अण्वस्त्र हल्ल्याच्या धमक्या देऊन ब्लॅकमेल करत असल्याचा तसेच अशा धमक्यांना आम्ही भीक घालत नसल्याचा इशारा दिला आहे. चाकू हा तोच असतो, पण त्याचा उपयोग तो कोणाच्या हातात आहे, यावर ठरत असतो. एखाद्या कुख्यात गुन्हेगाराच्या हातातील चाकू कोणाचा जीव घेऊ शकतो, तर एखाद्या निष्णात डॉक्टराच्या हातातील चाकू शस्त्रक्रिया करत रुग्णाचा प्राण वाचवू शकतो. अणुबॉम्बचेही तसेच आहे. भारत आपल्याजवळील अणुबॉम्बचा वापर शांततेसाठी करण्यास कटिबद्ध आहे, पाकिस्तान त्याचा वापर नरसंहारासाठी करू शकतो. कारण पाकिस्तानात लष्कर सांगेल तसे तेथील सरकार नाचत असते. पाकिस्तानातील लष्कर सरकारच्या नियंत्रणात नाही तर तेथील सरकार लष्कराच्या नियंत्रणात आहे. त्यामुळे तेथील लष्कराने सांगितले तर तेथील कठपुतळी पाकिस्तान सरकार अण्वस्त्राचा वापर करणारच नाही असे नाही. पाकिस्तानातील लष्कराला तर भारताविरुद्ध वातावरण पेटवायचेच असते. भारतविरोधी उन्माद निर्माण करत अंगात ताकद नसताना ते भारताला धडा शिकवण्याच्या वल्गना मारत असतात. आपल्या देशातील स्थिती याच्या एकदम उलट आहे. भारतात लष्कर पूर्णपणे सरकारच्या नियंत्रणात आहे. आपल्याकडे सरकार सांगेल तसे लष्कर वागत असते. आदर्श स्थिती हीच असते. पाकिस्तानचा आज तो सत्यानाश झाला, त्यासाठी ही परिस्थिती कारणीभूत आहे.

आजपर्यंत आपले चीनसोबत एक, तर पाकिस्तानसोबत दोन लढाया झाल्या. पण भारताने कधीच आपल्या शत्रुदेशाविरुद्ध अण्वस्त्रांचा वापर करण्याची धमकी दिली नाही. कारण अण्वस्त्र वापराचे दुष्परिणाम काय असतात, ते भारतासोबत जगानेही दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अनुभवले आहे. अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर अणुबॉम्ब टाकले होते, त्यात काही लाख लोक मृत्युमुखी पडले होते. जपानमधील अनेक पिढ्यांना या अणुबॉम्बच्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागले. या घटनेनंतर जगातील कोणत्याही देशाने अणुबॉम्बचा वापर केला नाही. मात्र भविष्यात होणारच नाही, असे नाही. सैतानी मानसिकतेचे राज्यकर्ते ज्या देशात आहेत, तेथे काहीही अशक्य नाही.

जगातील अनेक देशांनी अणुबॉम्ब बनवले असले तरी त्याचा कोणत्याही परिस्थितीत वापर न करण्याबाबत करारही केला आहे. पाकिस्तानने मात्र असा कोणताही करार केला नाही आणि पाकिस्तानने करार केला असला तरी पाकिस्तान त्याला बांधील राहील, याची खात्री जगातील कोणत्याच देशाला वाटत नाही. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा प्राधिकरणाने पाकिस्तानातील अण्वस्त्रे आपल्या ताब्यात घ्यावी, अशी सूचना राजनाथसिंह यांनी केली आहे. राजनाथसिंह यांची ही सूचना अतिशय समयोचित म्हणावी लागेल. आज नाही उद्या या संस्थेला पाकिस्तानातील अण्वस्त्रे आपल्या ताब्यात घ्यावीच लागतील. कारण पाकिस्तानने यावेळी भारताला नुसती धमकी दिली असली तरी पाकिस्तान ती प्रत्यक्षात आणणार नाही याची काहीही खात्री देता येत नाही. कारण पाकिस्तान सरकारचे नियंत्रण जसे लष्कराकडे आहे, तसेच ते अतिरेक्यांच्या संघटनांकडेही आहे. त्यामुळे भारताच्याविरोधात या अतिरेकी संघटना पाकिस्तानला अण्वस्त्रांचा वापर करण्यासाठी बाध्य करू शकतील. पाकिस्तानात राष्ट्रपती असो की पंतप्रधान यांना स्वतःची बुद्धी नाही आणि थोडीफार असली तरी ती वापरण्याचा अधिकारही नाही. लष्कर आणि अतिरेकी संघटनांचे म्होरके जे म्हणतील, त्याला या दोघांना मम् म्हणावे लागते. एकप्रकारे पाकिस्तानातील अण्वस्त्रे ही तेथील लष्कराच्या आणि सरकारच्या ताब्यात नाहीत, तर अतिरेक्यांच्या ताब्यात आहेत, असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये. या पृष्ठभूमीवर आम्हाला राजनाथसिंह यांच्या सूचनेकडे पाहावे लागेल. त्यामुळे संयुक्त राष्ट्र असो वा आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा प्राधिकरण यांना जगातील पाकिस्तानसारखे जे भस्मासुर देश आहेत, त्यांच्याकडील अण्वस्त्रांवर नियंत्रण आणण्याची वा ही अण्वस्त्रे थेट आपल्या ताब्यात घेण्याची गरज आहे. मुळात जगातील सर्व देश शांततापूर्ण सहजीवनाचा राग आळवत असताना अण्वस्त्रांची गरजच काय, असाही प्रश्न पडू शकतो. मात्र अण्वस्त्रे आहेत ही वस्तुस्थिती. भारतासारखे देश त्यांना 'प्रतिरोध' (डिटरन्ट) म्हणून वापरतात. जगात आज जे काही मोजके अण्वस्त्रधारी देश आहे, ते आपल्या अणुऊर्जेचा वापर शांततेसाठी तसेच विधायक कामासाठी करतात. त्यात भारताचा समावेश आहे. पाकिस्तानने अण्वस्त्रांचा वापर आतापर्यंत धमक्या देण्यासाठीच केला हा इतिहास आहे.

अणुऊर्जेचा वापर हा विधायक तसेच विध्वंसक अशा दोन्ही कामांसाठी करता येतो. पण अण्वस्त्रांचा वापर विधायक मार्गासाठी करणाऱ्या देशांची संख्या कमी होत आहे, तर विध्वंसक मार्गासाठी करणाऱ्या पाकिस्तानसारख्या सैतानांची जगातील संख्या वाढत आहे, ही चिंतेची बाब आहे. राजनाथसिंह यांच्या या विधानाचा आम्हाला या अंगानेही विचार करावा लागणार आहे. जग अण्वस्त्रांचे कोठार होणार नाही, याची काळजी भविष्यात आपल्या सगळ्यांना घ्यावी लागणार आहे. ज्यांना पाकिस्तानसारखे शेजारी लाभले, त्या भारताला तर थोडी जास्तच. शेजार निवडण्याचा अधिकार जगात कोणालाच नसतो. जे शेजारी लाभले, त्यादृष्टीने आपल्याला आपल्या देशाचे संरक्षणधोरण ठरवावे लागते. मोदींच्या नेतृत्वात आपल्या सरकारने अतिशय उपयुक्त असेच धोरण आखले आहे. त्यात पाकिस्तानसारख्या थिल्लर देशाला जगाच्या नकाशावरून संपवणे भारतासाठी चुटकीचा खेळ आहे. पण जगा आणि जगू द्या, ही भारताची भूमिका आहे. आम्ही तुम्हाला छेडणार नाही, पण तुम्ही छेडले तर सोडणारही नाही, या भूमिकेचा भारताने नुकताच पाकिस्तानला परिचय करून दिला आहे. हीच भारताची ताकद आहे.

## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# 'देश बुडू दे, सैन्य उजळू दे!'

सध्याच्या भारत-पाक संघर्षादरम्यान एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला तो म्हणजे दि इंटरनॅशनल मॉनेटरी फंडने (आयएमएफ) पाकिस्तानसाठी २.३ अब्ज डॉलर्सचे नवीन पॅकेज मंजूर केले. यापैकी १ अब्ज डॉलर्स एक्सटेंडेड फंड फॅसिलिटी (ईएफएफ) अंतर्गत तत्काळ दिले जातील आणि १.३ अब्ज डॉलर्स नवीन रेझिलियन्स ॲण्ड सस्टेनेबिलिटी फॅसिलिटी (आयआरएसएफ) द्वारे देण्यात येतील. भारताने यावर आक्षेप नोंदवत या पॅकेजबाबत मतदान न करण्याचा पवित्रा घेतला. कारण पाकिस्तान वारंवार दहशतवादी कारवाया करून भारतात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. मात्र ही बोलणी पूर्वनियोजित असल्याने या फंडवर शिक्कामोर्तब करण्यात आला. तरी भारताने विरोध दर्शवल्यामुळे भारताचा आक्रमक चेहरा जगाने पाहिला. आता याबाबत एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. एका वृत्तवाहिनीने दिलेल्या रिपोर्टनुसार, पाकिस्तान जेव्हा जेव्हा आयएमएफकडून जितके कर्ज घेतो, त्यापेक्षा कैक पटीने जास्त आपल्या सैन्यावर खर्च करतो. पाकिस्तान प्रत्येक वेळी पैशांसाठी आंतरराष्ट्रीय दरवाजे ठोठावताना आर्थिक संकट म्हणून रडारड करतो; मात्र सैन्य दलावरील खर्च वाढवत जातो.

१९९९ मध्ये पाकिस्तानला आयएमएफकडून ६११ दशलक्ष डॉलर्स मिळाले, परंतु पाकने संरक्षणावर ३.०८ अब्ज डॉलर्स खर्च केले. पुढील आकड्यावरून पाकची नीती स्पष्ट होण्यास मदत होईल. १९९९ ते २०२३ दरम्यान पाकिस्तानला अर्थव्यवस्था स्थिर करण्यासाठी आयएमएफकडून २२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निधी मिळाला. त्याच काळात पाकिस्तानने आपल्या लष्करावर सुमारे १८५ अब्ज डॉलर्स खर्च केले. हा खर्च आयएमएफ निधीपेक्षा पाच ते दहा पट जास्त होता. आयएमएफ निधी देताना इंधन अनुदानात कपात करणे, कर वाढवणे यासारख्या उपाययोजना करण्याचा सल्ला देते. मात्र पाकने आपले संरक्षण बजेट आश्चर्यकारकरीत्या वेळोवेळी वाढवले आहे. आज पाकिस्तानची अर्थव्यवस्था ढासळत आहे. पाकिस्तान जीडीपीमध्ये भारतापेक्षाच नव्हे तर बांगलादेशापेक्षाही मागेच आहे. पाकमध्ये गरिबीत वाढ



झाली आहे. तरी गेल्या काही वर्षांतला लष्करावरील खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे.

२००८ जागतिक आर्थिक संकट दरम्यान आयएमएफने ३.१ अब्ज डॉलर्सची मदत केली. मात्र पाकने ५.२३ अब्ज डॉलर्स लष्करावर खर्च केले. २०१३-१४ कर्ज आणि ऊर्जा संकट दरम्यान आयएमएफने २.१८ अब्ज डॉलर्स दिले तर ८.६८ अब्ज डॉलर्स लष्करावर खर्च करण्यात आले. २०१९ मध्ये आयएमएफतर्फे १.३७ अब्ज डॉलर्स देण्यात आले; याउलट १०.४ अब्ज डॉलर्स एवढा लष्करी खर्च करण्यात आला. २०२२ साथीच्या रोगादरम्यान आयएमएफने मदत म्हणून २.१८ अब्ज डॉलर्स पाकिस्तानला दिले तर पाकिस्तानने १०.३४ अब्ज डॉलर्स लष्करासाठी खर्च केले.

दुसरीकडे पाकिस्तान हे अतिरेक्यांचे माहेर आहे. हे आरोप पाकिस्तानने फेटाळून लावले असले, तरी अनेकदा पाक हा अतिरेक्यांना शरण देणारा सर्वांत मोठा देश असल्याचे सिद्ध झाले आहे. पाकिस्तानने दहशतवादाला आश्रय देण्यासाठी किती पैसे खर्च केले, याची अचूक आकडेवारी नाही. कारण अशा कारवाया गुप्तपणे केल्या जातात. मात्र एका अंदाजानुसार आयएसआय दहशतवादी संघटनांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी १,२५,२५० दशलक्ष डॉलर्स खर्च केले जातात. काश्मीरसाठी पाकिस्तान दरवर्षी सुमारे ५ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच सुमारे २४० कोटी रुपये दहशतवादाला प्रोत्साहन देण्यासाठी खर्च करतो. जम्मू आणि काश्मीरमधील सर्व दहशतवादी निधीसाठी ७०८० दशलक्ष डॉलर्स दरवर्षी खर्च होतात, असा एक अंदाज आहे. यापैकी ९० टक्के निधी आयएसआय किंवा परदेशी धर्मादाय संस्थांकडून येतो. पाकिस्तानवर लष्कर-ए-तोयबा, जैश-ए-मोहम्मद अशा अतिरेकी टोळ्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे चालवण्याचा आरोप आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने असे अनेक अतिरेकी अड्डे नष्ट केले आहेत. याचा अर्थ पाक हा देश अतिरेक्यांना संरक्षण, प्रशिक्षण देतो व आतंकी कारवाई करण्यास प्रोत्साहित करतो हे आता पूर्णपणे उघड झाले आहे.

गेल्या २५ वर्षांत आंतरराष्ट्रीय संस्थांनी पाकिस्तानला जितके पैसे दिले, त्यापेक्षा जास्त पैसे पाकने लष्करावर खर्च केले आहेत आणि अतिरेकी कारवायांवरदेखील खर्च केले आहेत. त्यामुळे पाकिस्तानचे बजेट हे छुपा आहे, हे स्पष्ट होतं. २०२३ मध्ये आयएमएफने १.२ अब्ज डॉलर्स पाकला दिले. पण त्याच वर्षी पाकिस्तानने आश्चर्यकारकरीत्या लष्करी बजेटवर ८.५२ अब्ज डॉलर्स खर्च केले. हा खर्च आयएमएफने केलेल्या मदतीपेक्षा सात पट होता.

आयएमएफने कितीही कठोर अटी ठेवल्या, तरी पाकिस्तानने त्या अटींना लष्करी बजेटवर हावी होऊ दिले नाही. शिक्षण आणि आरोग्यसेवा यासारख्या नागरी गरजांपेक्षा संरक्षण खर्चाला प्राधान्य देण्याच्या अट्टहासामुळे बरेचदा टीका झाली आहे. मात्र पाकिस्तानी लष्कराचा राजकारणावर प्रचंड प्रभाव आणि वर्चस्व आहे. बऱ्याचदा लष्कराने सत्तापालट घडवून आणले आहे. त्याचबरोबर अतिरेक्यांचाही या देशावर प्रभाव आहे. अतिरेकी ही या देशासाठी सामान्य बाब आहे. हा त्यांचा स्वाभाविक भाव आहे. तिथल्या सामान्य जनतेनेही हे स्वीकारलेले आहे. अशा प्रकारचा हा देश आपला शेजारी आहे आणि दुर्दैव म्हणजे आपण या जनावरांना सोन्याच्या तबकात पाकिस्तान देऊन टाकला होता.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

### अनिल फेकरीकर

# राष्ट्रीय संपत्तीची लूट थांबावी!

सीमा सुरक्षेसाठी सैन्य रात्रंदिवस सुरक्षा व्यवस्थेत तैनात आहे. पण देशात राहणाऱ्या चोरांच्या टोळ्या खुलेआम राष्ट्रीय संपत्तीची लूट करीत आहेत. एवढी मोठी लूट करूनही ते मोकाट फिरत आहेत. त्या संदर्भात त्यांना एखादी शिक्षा सोडा, कोणी त्यांना बोलूही शकत नाही. एवढी दहशत त्या चोरांच्या टोळ्यांची झाली आहे. अशा स्थितीत सामान्यांनी डोळे उघडे ठेवत राष्ट्रीय संपत्तीची लूट होऊ द्यायची काय? असाच प्रश्न उपस्थित झाला आहे. पहलगाम येथे हल्ला करीत अतिरेक्यांनी २६ लोकांना मारून टाकले. त्याचा वचपा भारत सरकारने 'ऑपरेशन सिंदूर' राबवून घेतला. आपले भारतीय थोडे संवेदनशील आहेत. माणूस गेल्यावर खूप रडतात. तो खूप चांगला होता अशीही महती सांगतात. पण जिवंत असताना त्या माणसाला मदतीसाठी कुणीच पुढे जात नाही. हीच अवस्था गोधनाच्या संदर्भात घडत आहे. कावळा गेला, चिमणीही गेली. आता गाईचा क्रमांक आला आहे. थोडेफार दुर्लक्ष केले तर उद्या देशी गाईसुद्धा कुणालाही दिसणार नाहीत, हे नक्की.

आज कुठल्याही नदी किनारी असलेल्या गावात जा, तिथे रेती तस्करांच्या टोळ्या तयार झाल्या आहेत. जे कालपर्यंत फाटके होते आज ते कोट्यवधींच्या गोष्टी करीत फिरत आहेत. कुणाच्या बळावर त्यांनी हा पैसा कमावला, याचेही उत्तर शासनाने शोधायला हवे. त्यांनी देशाची राष्ट्रीय संपत्ती लुटली. एखाद्याच्या घरी चोरी झाली तर गावभर बोंब होते. येथे तर दररोज देशातील



संपत्ती रात्री लुटली जात आहे. मग प्रशासनातील विशेषतः महसूल खात्याचा, पोलिस विभागाचा अधिकारी, कर्मचारी पेटून का उठत नाही? झारीतील शुक्राचार्य यातून तोडपाणी करण्याचा मार्ग शोधत असतात. कारण ती संपत्ती त्यांची नसून, राष्ट्राची आहे ना? आज आपल्या भारतीयांना पुन्हा एकदा खऱ्या अर्थाने प्रतिज्ञा सांगण्याची गरज आहे.

त्यानुसार ''भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन. मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडिलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन. माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यातच माझे सौख्य सामावले आहे''. ही प्रतिज्ञा महसूल, पोलिस, आरटीओसह सर्वच विभागातील कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांनी समजून घ्यावी. तसे पाहता प्रशासनात कार्यरत अधिकारी, कर्मचारी या देशाचे नागरिक नाहीत का? त्यांना ही प्रतिज्ञा लागू नाही का? समजा त्यांना लागू असेल तर मग रोज खुलेआम रेतीची तस्करी, गोधनाची तस्करी कशी काय होते, याचे उत्तर त्यांनी द्यावे.

पोलिस विभाग रोज कारवाई करतो आणि कोट्यवधी रुपयांची वाहने रेतीसह जप्त करतात. ती वाहने काही दिवसांनी कोर्टातून सहजतेने सोडली जातात. याकरिता संपूर्ण फळी आरोपींच्या दिमतीला हजर असते. पण एखादा सामान्य माणूस क्षुल्लक प्रकरणात अडकला तर कोर्टातून त्याला न्याय मिळतच नाही. पण मोठे मासे बड्या प्रकरणात अडकल्यावर सहजतेने त्यांना न्याय मिळतो, याचेही उत्तर सरकारमधील सुजाण लोकांनी शोधायला हवे. रेती, मुरूम याला गौण खनिज संपत्ती म्हटले जाते. ही संपत्ती या देशातील प्रत्येक नागरिकाच्या मालकीची आहे. पण ही संपत्ती माझी असल्याची भावनाच आपल्या लोकांमध्ये रुजलेली नाही. देशातील साधन-संपत्तीच्या रक्षणासाठी जागरूक असलेले नागरिकच देशाचे खरे रक्षक असतात. दुर्दैवाने देशातील साधन-संपत्तीची लूट सर्वांच्या डोळ्यादेखत होत असते. पण कुणीही ती रोखत नाही. हे थांबायला हवे; पण थांबवणार कोण हा प्रश्न आहे.

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

### नागेश दाचेवार

# सनातन राष्ट्र शंखनाद!

कुंभमेळ्याला जसे कोट्यवधी भाविक, संत-महंत एकत्र आलेत, त्याचप्रमाणे पहिल्यांदाच गोव्याच्या पावन भूमीवर १७ ते १९ मे कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या' निमित्ताने एक दिव्य आध्यात्मिक कुंभमेळा भरतो आहे. या महोत्सवात २३ देशांतील नागरिक आणि संत-महंत, धर्मप्रेमी हिंदू, तसेच २५ हजारांहून अधिक भाविक ४ ते ५ दिवस वास्तव्य करणार असून, संतांच्या वाणीची ज्ञानगंगा, एक कोटी रामनाम जपयज्ञ, शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन, विविध संतांच्या पावन पादुका, एक हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दुर्मिळ दर्शन आणि महाधन्वंतरी ते शतचंडी यज्ञयाग या उपक्रमांचा समावेशही आहे. महोत्सवाची सर्व तयारी पूर्ण होत आली असून, लवकरच सर्वांना भक्ती आणि शक्ती यांचा सुरेख संगम गोव्यात पाहायला मिळणार आहे.

वैश्विक इतिहासात अनेक संस्कृती उदयाला आल्या आणि लोप पावल्या. उदाहरणार्थ इजिप्शियन, ग्रीक, रोमन, संस्कृती आदी. पण राजकीय संघर्ष, परकीय आक्रमणे, नैसर्गिक आपत्ती आदी संकटांना तोंड देत एकच संस्कृती टिकून राहिली, ती म्हणजे 'सनातन संस्कृती.' सनातन म्हणजे शाश्वत, चिरंतन टिकणारे, तरीही नित्यनूतन असणारे तत्त्व. सनातन धर्माने नेहमीच विश्वकल्याणाची संकल्पना मांडली आहे. सनातन धर्म हाच भारताचा प्राण आहे. जोपर्यंत सनातन धर्माचे अनुसरण होत होते, तोपर्यंत भारत वैभवाच्या शिखरावर होता; पण गेल्या काही दशकांमध्ये सनातन धर्माकडे हेतुपुरस्सर हेटाळणीच्या रूपात पाहिले गेले. परिणामस्वरूप अनेक कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, धार्मिक, तसेच राष्ट्रीय संकटे निर्माण झालीत. आज आंतरराष्ट्रीय अनुदानावर पोसल्या जात असलेल्या अनेक व्यक्ती, तसेच संघटना सनातन धर्म संपवण्याचा विडा उचलून कार्यरत झाल्या आहेत.

या पृष्ठभूमीवर सनातन धर्माच्या रक्षणासाठी देव, देश, धर्म यांची सेवा करणाऱ्या व्यक्ती, संस्था, तसेच संघटना यांचे संघटन आणि जागरण होणे आवश्यक आहे. सनातन धर्माच्या बळकटीकरणातूनच रामराज्यासम तेजस्वी



राष्ट्राचे निर्माण शक्य आहे. त्यासाठीच गोवा येथे १७ ते १९ मे या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

सनातन सिद्धांत हे मूलतः कल्याणकारी, व्यक्तीची ऐहिक-पारमार्थिक उन्नती साधणारे, तसेच सर्वसमावेशक आहेत. ते कुठल्याही व्यक्तिसमूहापुरते संकुचित नसून अखिल मानवजातीसाठीच लागू आहेत. सनातन तत्त्वे ही न्याय, समानता, नीती, योग, साधना आदींवर आधारित आहेत. वेद, उपनिषदे, गीता, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी आदी सनातन धर्मग्रंथांमध्ये याविषयीचे तत्त्वज्ञान आहे. सनातन राष्ट्र हे या तत्त्वांवर चालणारे एक आदर्श कल्याणकारी राष्ट्र असेल. थोडक्यात, त्रेतायुगातील रामराज्याचे कलियुगातील स्वरूप म्हणजे 'सनातन राष्ट्र' असे म्हणता येईल.

सध्याच्या धर्मनिरपेक्ष व्यवस्थेत गो, गंगा, गीता, तुळस, मठ-मंदिरे आदी सनातन मानबिंदूंवर सातत्याने आघात होत आहेत. आधुनिकता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली सनातन श्रद्धास्थानांचे हनन केले जात आहे. हिंदूंच्या धार्मिक परंपरा, आचार यांना अंधश्रद्धेचे 'लेबल' लावले जात आहे. वैदिक विज्ञानाला छद्म विज्ञान म्हणजे 'सुडो सायन्स' असे म्हणत टीका केली जात आहे. कौटुंबिक स्तरावर पाहायला गेले, तर देवीस्वरूप मानली गेलेली महिला सुरक्षित नाही. कुटुंबामध्येसुद्धा एकमेकांमधील आपुलकी, जिव्हाळा कमी झाला असून, व्यक्ती भौतिकदृष्ट्या संपन्न झाल्या असल्या, तरी मानसिकदृष्ट्या दुर्बल झाल्या आहेत. माणसांची संकटांना सामोरे जाण्याची क्षमता कमी झाली आहे, असे पाहायला मिळते. या सगळ्या परिस्थितीचे मुख्य कारण म्हणजे धर्माचरण आणि साधना-उपासना यांच्या बळाचा अभाव आहे. धर्माचे अधिष्ठान असेल, तरच व्यक्तीची, पर्यायाने समाजाची आणि राष्ट्राची उन्नती होते. धर्मविहीन भारत म्हणजे केवळ भूगोल असून भारताच्या गौरवशाली इतिहासाची परंपरा भविष्यातही चालवायची असेल, तर धर्माचे रक्षण होणे आवश्यक आहे.

आज धर्मावरील आघातांच्या विरोधात जागृती होऊन धर्मरक्षणार्थ चळवळी होत असल्या, तरी हिंदुत्वावर होत असलेले आघात पूर्णपणे थांबले नाहीत. 'प्लेसेस ऑफ वर्शिप ॲक्ट'सारख्या काळ्या कायद्यांनी परकीय आक्रमकांनी उद्ध्वस्त केलेल्या मंदिरांच्या पुनर्निर्माणाचा मार्ग अडवला आहे. नुकत्याच पारित झालेल्या सुधारित वक्फ कायद्यामुळे वक्फ बोर्डाच्या मनमानीला काही प्रमाणात आळा बसला असला, तरी या कायद्याची प्रत्यक्ष कार्यवाही होऊन धर्मांधांकडून अवैधरीत्या बळकावल्या गेलेल्या जमिनी मोकळा श्वास कधी घेतील, हे येणारा काळच सांगेल. आज घुसखोरीमुळे भारतापुढे गंभीर संकट निर्माण झाले आहे. वर्तमान व्यवस्थेत धर्म आणि राष्ट्र यांवरील आघात सक्षमपणे परतवले जात नसल्याने सनातन राष्ट्राची आवश्यकता आहे. देशाचा विकास केवळ जीडीपी किंवा टेक्नोलॉजी यामुळे होत नाही, तर तो धर्म आणि संस्कृतीमुळे होतो. (धर्मेण जयति राष्ट्रम्), म्हणूनच भारतीय संस्कृतीत सोन्याच्या लंकेची नाही, तर श्रीरामाच्या रामराज्याची पूजा केली जाते.

'सनातन राष्ट्र शंखनाद' हा केवळ धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रम नसून, तो धर्म आणि राष्ट्ररक्षणाच्या वाटचालातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताच्या उज्ज्वल भविष्याचा हा शंखनाद आहे. या निमित्ताने सनातन धर्माच्या सेवेसाठी कृतिशील आणि गतिशील होणे, हे एकप्रकारे राष्ट्ररचनेच्या अर्थात् धर्मसंस्थापनेच्या कार्यात सहभागी होण्यासारखे आहे. आणि ही काळाची गरजही आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### विद्यार्थ्यांचे मत विचारात घेणे गरजेचे

बारावीचा निकाल लागताच प्रत्येक विद्यार्थ्यांचे पालक पुढील शिक्षणाचे ध्येय मनामध्ये बाळगतात. मात्र आपल्या मुलांचे पुढील शिक्षणाबद्दल मत सध्या विचारत घेणे गरजेचे आहे. पालक बळजबरीने आपल्या आवडीनुसार मुलांना शिक्षण घेण्यास सांगतात. मात्र मुलांचीही आवड निवड असते त्यानुसारच पुढील शिक्षण घेण्यास सांगावे तरच खऱ्या अर्थाने त्यांची प्रगती होईल. आई-वडिलांच्या इच्छेनुसार जर मुले शिक्षण घेऊ लागली तर म्हणावी तेवढी शैक्षणिक प्रगती व आवड निर्माण होणार नाही. आपल्या आई-वडिलांचे मन मोडू नये म्हणून इच्छा नसतानाही नाईलाजास्तव काही मुले शिक्षण घेत असतात. आज बऱ्याच मुलांचे आई-वडील भरमसाट पैसा खर्च करून बळजबरीने आपल्या मुलांना शिक्षण घेण्यास भाग पाडतात. मनात नसतानाही केवळ पालकांची प्रतिष्ठा जपण्यासाठी मुले न झेपणारे विषय निवडतात आणि स्वतःचे नुकसान करवून घेतात. रात्रंदिवस अभ्यास करून सुद्धा आई-वडिलांनी पसंत केलेल्या शैक्षणिक क्षेत्रात यश मिळत नाही. यामुळे मुलांमध्ये नैराश्य निर्माण होते. त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार घोळत असतात. म्हणून मुलांची बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी व उज्ज्वल भविष्यासाठी त्यांना शैक्षणिक क्षेत्रामध्ये स्वातंत्र्य दिले पाहिजे. तरच आपल्या पाल्यांना जीवनात चौफेर विकास साधता येईल.

**अर्जुन गाडेकर दर्शनाळ**/अक्कलकोट

●● ●●

### सेवक-अधिकारीपदाचे मृगजळ

मे महिन्यात कृषी सहायक संपावर आहेत. सरकार दरबारी त्यांची संघटना ठाण मांडून आहे. का? तर आम्हाला कृषी सहायक अधिकारी पद आणि मदतनीससह लॅपटॉप द्या! ही मागणी रास्त ठरण्यास सरकारचे काही निर्णय कारणीभूत ठरतात. ग्रामसेवक आता ग्रामपंचायत अधिकारी बनला आणि सेवेला रोजगार सेवक, कॉम्प्युटर चालक आणि शिपाई, स्मार्ट केबीन ती वेगळीच! बरे कृषी सेवकांच्या तीन वर्ष खडतर तपस्येनंतर १०-१२ गावचे शेतकरी सांभाळून वरिष्ठ अधिकारी यांची मर्जी संपादन करून पदरात पडलेले सहायकपद!

शेततळे, फळबागा, प्रधानमंत्री योजना, आपत्ती व्यवस्थापन इतकी कसरत करूनही उणिवा असण्याचा ठपका! कृषी विभागात अनेक पदे रिक्त असल्याच्या बातम्या येत असतात आणि प्रभारी अधिकारी ते पद सांभाळताना निर्णय घेण्यास कमी पडतात. कोणतेही सरकारी पद हे देशसेवेकरिता असते याचे भान ठेवल्यास सेवक-अधिकारी मृगजळ राहणार नाही.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

●● ●●

### स्वप्नांची ताकद प्रगतीची, यशाची गुरुकिल्ली

स्वप्नं ही माणसाच्या आयुष्यातील सर्वांत मोठी प्रेरणा असते. ती केवळ डोळे मिटून पाहिलेली दृश्ये नसतात, तर ती आपल्याला उभे राहायला, चालायला आणि पळायला शिकवतात. प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या प्रवासाची सुरुवात एखाद्या छोट्याशा स्वप्नानेच झालेली असते. स्वप्न माणसाला खंबीर बनवतात. जेव्हा आयुष्यात अडचणी येतात, तेव्हा हेच स्वप्न त्याला पुन्हा उभे राहायला मदत करतात. आपले ध्येय, आकांक्षा आणि भविष्याबद्दलची दृष्टी यामध्ये असलेली शक्ती. ही ताकद आपल्याला काहीतरी मोठे करण्यासाठी किंवा मिळवण्यासाठी ऊर्जा आणि प्रोत्साहन देते. आयुष्यात पुढे कसे जायचे, कोणते मार्ग निवडायचे हे स्पष्ट करते. कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्यास मदत करते. जेव्हा अडचणी येतात, तेव्हा स्वप्ने आपल्याला लढण्याची आणि पुढे जाण्याची ताकद देतात. नुसती कल्पना न ठेवता, ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देते. भविष्याबद्दल सकारात्मक राहण्यास आणि चांगले दिवस येतील यावर विश्वास ठेवण्यास शिकवते.

स्वप्नांची ताकद ही आपल्या प्रगतीची आणि यशाची गुरुकिल्ली आहे. स्वप्न आपल्याला दिशा देतात, प्रेरणा देतात आणि आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवण्यास मदत करतात. जेव्हा आपण मोठी स्वप्ने पाहतो आणि त्यासाठी मेहनत करतो, तेव्हाच आपल्याला यश मिळते. त्यामुळे आपली स्वप्ने जपणे, त्यांना वास्तवात बदलण्याचा प्रयत्न करणे ही आपल्या जीवनात अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

स्वप्नांची ताकद ही आपल्या प्रगतीची प्रेरणा आणि प्रेरणादायक शक्ती असते. स्वप्न आपल्याला ध्येय निश्चित करण्यास, नवीन संधी शोधण्यास आणि अडचणींवर मात करण्यासाठी प्रोत्साहन देतात. जेव्हा आपले स्वप्न मोठे असते, तेव्हा ते आपल्याला अधिक मेहनत घेण्याची आणि आपले सर्वोत्तम देण्याची प्रेरणा देतात. त्यामुळे, स्वप्नांची ताकद ही आपल्याला प्रगतीच्या मार्गावर चालण्याची ऊर्जा आणि दिशा प्रदान करते.

स्वप्न माणसाला सामान्याच्या पलीकडे नेऊन असामान्य बनवतात. ती त्याच्या आतल्या क्षमतांना जागे करतात आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखवतात. स्वप्न हेच ध्येयाचं पहिलं पाऊल असतं. पण फक्त स्वप्न पाहणं पुरेसं नसतं. त्यासाठी जिद्द, परिश्रम आणि चिकाटी लागते. स्वप्नांमागे धावत राहणं हीच खरी यशाची गुरुकिल्ली असते. थोडक्यात, स्वप्नांची ताकद ही आपल्या प्रगतीची आणि यशाची गुरुकिल्ली आहे. ती आपल्याला आपल्या पूर्ण क्षमतेचा वापर करण्यास आणि आपले जीवन अधिक अर्थपूर्ण बनवण्यास मदत करते.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# भारतीय सैन्यांच्या सन्मानार्थ हिंगोलीत तिरंगा यात्रा

## ऑपरेशन सिंदूर पंतप्रधान मोदी आणि भारतीय सैनिकांना यशस्वीपणे पार पाडले- राज्यमंत्री मेघना साकोरे









**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मे**

पहलगाम येथील निरपराध २६ लोकांना धर्म विचारून गोळ्या घालून दहशतवाद्यांनी अमानुषपणे ठार मारले. संपूर्ण देशभरात दहशतवादाविरोधी कठोर कारवाईची मागणी होत होती. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कणखर नेतृत्व आणि भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानात घुसून तेथील नऊ दहशतवादींचे ठिकाणे उध्वस्त केली. तसेच भारतावर हल्ला करणाऱ्या पाकिस्तानला सैनिकांनी जशास तसे उत्तर दिले. अखरे पाकिस्तानाला शरणांगती पत्करावी लागली. भारतीय सेनेचा देशभरातील सर्व जनतेला अभिमान असून त्यांच्या सन्मानार्थ सर्व जाती धर्माचे लोक तिरंगा यात्रा काढीत आहेत. देशातील १४० कोटी जनता भारतीय सेनेमुळेच सुरक्षित आहे, असा विश्वास भाजपच्या संपर्कमंत्री तथा राज्यमंत्री मेघना- ताई साकोरे यांनी तिरंगा यात्राप्रसंगी व्यक्त केले.

भारतीय सैनिकांनी पाकिस्तानात घूसून दहशतवाद्यांचे ठिकाणे उध्वस्त केली. ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे पार पाडले. पहलगाम येथील निरपराध मृत्यू पावलेल्या लोकांचा बदला भारतीय सैनिकांनी घेतला. तसेच पाकिस्तानातील ऐअरबेसही उध्वस्त केले. भारतीय सेनेची ताकद लक्षात आल्यानंतर पाकिस्तानने अमेरिका आणि भारताला युध्दविरामची विनंती केली.






भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ शनिवारी येथील गांधी चौकातून तिरंगा यात्रा काढण्यात आली. सकाळी १० वाजता भाजपच्या संपर्कमंत्री तथा राज्यमंत्री मेघना साकोरे यांच्या नेतृत्वात ही तिरंगा यात्रा काढण्यात आली. यावेळी भारत माता की जय च्या घोषणा देत हातात तिरंगा घेऊन सर्व जाती धर्माच्या लोकांनी भारतीय सैनिकांच्या कामगिरीबद्दल आभार मानले.

यावेळी स्वामी परमार्थ देव महाराज भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आमदार रामराव वडकुते, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, ॲड प्रभाकर भाकरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे, क्रिष्णा रूहीटीया, अल्का लोखंडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, सुभाष लदनिया, भिकुलाल बाहेती, पंकज अग्रवाल, शाम खंडेलवाल, मनोज शर्मा, संजय ढोके यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच सामान्य नागरिक, मुस्लीम बांधव यांनी सहभाग घेतला होता. हातात तिरंगा ध्वज घेत शहरातील गांधी चौकातून जवाहर रोड, पोस्ट ऑफीस रोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्याजवळ या तिरंगा यात्रेचा समारोप करण्यात आला.

यावेळी बोलतांना राज्यमंत्री मेघनाताई साकोरे म्हणाल्या की, विंग कमांडर सोफीया कुरेशी आणि व्योमिका सिंह यांनी देशाच्या संरक्षणासाठी योगदान देत आहेत. नारीशक्ती आज देशाच्या संरक्षणात मोठा वाटा उचलत आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैन्यांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून पहलगाम मधील पिडीत कुटुंबांना न्याय दिला. दहशतवाद्यांना पोसणाऱ्या आणि त्यांना प्रशिक्षण देणाऱ्यांना पंतप्रधान मोदी आणि भारतीय सेनेने धडा शिकवला आहे. यापुढे असे कृत्य करण्यापूर्वी दहशतवाद्यांना शंभरवेळा विचार करावा लागेल. अजूनही ऑपरेशन सिंदूर चालूच असून दहशतवाद्यांचा खात्मा भारतीय सैन्यांकडून होत आहे असेही यावेळी त्या म्हणाल्या.

# पोलिस प्रशासनाच्यावतीने बस स्थानकात मॉक ड्रिल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मे**

येथील बसस्थानकात जिल्हा पोलिस प्रशासनाच्यावतीने शुक्रवारी दुपारी मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते.

बस स्थानकात अचानक तीन ते चार दहशतवादी शिरले त्यांनी काही महिला आणि पुरूषांना बंदीस्त बनविले. त्यांना बंदुकीच्या जोरावर नेत असतांना पोलिसांना याची माहीती मिळाल्यानंतर पोलिस पथक लवाजम्यासह बस स्थानक परिसरात दाखल झाले. यावेळी बस स्थानकातील नागरिकांना काय घडत आहे याची मुळीच माहीती नसल्याने ते गोंधळून गेलेले दिसत होते. अचानक दहशतवादी बस स्थानकात आल्यामुळे धावपळ सुरू झाली. तितक्यात पोलिसांनी लोकांना घाबरून न जाता सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले.



त्यानंतर पोलिसांनी दहशतवाद्यांच्या दिशेने मोर्चा वळवीत बंदीस्त असलेल्या महिला व पुरूषांना जीवाची बाजी लावून दहशतवाद्यांच्या तावडीतून सोडविले. हे सर्व दृश्य बस स्थानकातील प्रवाशी मोठ्या उत्सुकतेने पाहत होते. कठीण प्रसंगी लोकांनी कोणती खबरदारी घ्यावी याचे मॉक ड्रिल पोलिस प्रशासनाच्यावतीने यशस्वीपणे पार पाडले. यावेळी पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्यासह विविध पथकांनी त्यांची कामगिरी चोखपणे बजावली.



**हिंगोली- भारत स्वाभिमान, पतंजली योग समिती यांच्यावतीने आजपासून भव्य योग शिबीराचे आयोजन येथील संत नामदेव कवायत मैदानावर करण्यात आले. यावेळी हरिद्वार येथील स्वामी परमार्थदेव महाराज यांनी योगासने व मार्गदर्शन केले. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजानन घुगे यांच्यासह हजारो नागरिक, समितीचे कार्यकर्ते योग शिबीरात सहभागी झाले होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिरड शहापूर जि प निकालाची यशस्वी परंपरा

शिरड शहापूर- मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षेत जिल्हा परिषद प्रशाला शिरड शहापूर चा निकाल ८४.७६% लागला आहे. यात प्रथम क्रमांक ओमकार बेले ८२% द्वितीय क्रमांक करण चोरघडे ८१ % व तृतीय क्रमांक संगदीप कठाळे ७९%टक्के पास झालेले आहेत. यात विशेष प्राविण्य -६ प्रथम श्रेणी- १२ द्वितीय श्रेणी २६ व तृतीय श्रेणी -६ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. औंढा नागनाथ तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला शिरड शहापूर या शाळेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद असतो. या शाळेत येणारे विद्यार्थी सर्वसामान्य कुटुंबातील असून कुठलेही शिकवणी वर्ग नसताना शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या बळावर शाळेचे नाव व स्वतःचे नाव उज्वल केले. दरवर्षी प्रमाणे निकालाची परंपरा कायम राखली.त्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सर्व सदस्य यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मुख्याध्यापक ढगे, पाटील, व्यवहारे, साबेर, राठोड, श्रीमती पोटे, निवडुंगे, धुळे, चंद्रवंशी, खरात, चव्हाण, सोनटक्के, शेवाळे तसेच शिक्षकेतर कर्मचारी शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मोंढ्यात शेतकऱ्यांचा माल उघड्यावर



हिंगोली- येथील नवा मोंढा भागात शनिवारी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात तुर विक्रीसाठी आणली होती. परंतु मोंढ्यातील यार्डात पूर्वीपासून व्यापाऱ्यांच्या मालाच्या थप्प्या असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा माल यार्डाच्या भिंतीजवळ टाकावा लागला. दुपारनंतर अचाकन अवकाळी पाऊस सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांचा उघड्यावर ठेवलेला माल भिजू नये यासाठी शेतकऱ्यांना धावपळ करावी लागली. सध्या तुरीला प्रतिक्विंटल ७ हजार रूपये भाव मिळत असल्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर तुर विक्रीसाठी आणत आहेत.

### योग शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंगोली- पतंजली योग समितीच्यावतीने येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर स्वामी परमार्थदेव महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तीन दिवशीय योग शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी पहिल्याच दिवशी या शिबीराला मोठ्या संख्येने शहरासह ग्रामीण भागातील महिला, पुरूष, युवक-युवती यांनी हजेरी लावली. यावेळी स्वामी परमार्थ देव महाराज यांनी विविध योगासने आणि त्यांचे महत्व सांगत सर्वांना प्रशिक्षण दिले.

# श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्यावतीने नूतन जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगेंचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मे**

येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने नवनियुक्त भाजपा हिंगोली जिल्हा अध्यक्ष माजी आमदार गजाननरावजी घुगे यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मंडळी, विधि तज्ञ, व प्रतिष्ठित व्यापारी बहुसंख्येने उपस्थित होते.

भाजपा जिल्हाध्यक्ष म्हणून जिल्ह्यातील सुपरीचीत राजकीय सामाजिक व धार्मिक कार्यातील अग्रेसर व्यक्तिमत्व म्हणून प्रसिद्ध असलेल्या माजी आमदार गजाननराव घुगे यांची निवड झाली. या निवडीमुळे राज्य व केंद्र सरकार भारतीय जनता पार्टी व मित्र पक्षाचे आहे, त्यामुळे जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पाठपुरावा करण्याचे महत्त्वाचे कार्य व पक्ष संघटना वाढविण्याचे कार्य करण्याची जबाबदारी त्यांना मिळालेली आहे. या जबाबदारीबद्दल हिंगोलीकरांच्या वतीने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे. श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान, लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमाला ग्रुप व ओम योगा ग्रुप तसेच शैक्षणिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी त्यांचा सत्कार केला.

या सत्कार प्रसंगी प्राचार्य डॉ. विलास आघाव, ॲड निवृत्तीराव घुगे, प्रतिष्ठित व्यापारी कांतासेठ गुंडेवार, वीरकुवर अण्णा, सुभाष भरड, राजू मुंढे, सोनू नैनवाणी श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे मेजर पंढरीनाथ घुगे, संजय बांगर, गोपाल बांगर, गजानन गुट्टे, सारंग गीते, गोविंद कांगणे, नितीन घुगे, भास्कर बांगर, प्रा. त्रंबक केंद्रे प्रा. संजय फड, भास्कर बांगर, ओम योगा ग्रुपचे काशिनाथरावजी दराडे ,श्री गुंडेवार, प्रा. शिवकुमार पराती, प्रा. उमेश राजुलवार, प्रा. राम तोडकर, तसेच बाबा घुगे, शाम खंडेलवाल, व संदीप वाकडे आदी उपस्थित होते.

# हिवताप कार्यालयात राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ मे**

जनतेमध्ये डेंग्यू आजाराची जनजागृती निर्माण व्हावी, प्रतिबंधात्मक उपाययोजनाअंमलबजावणीसाठी जनतेचा सक्रीय सहभाग प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, जिल्हा आरोग्य अधिकारीडॉ.कैलास शेळके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा हिवताप कार्यालयात वजिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थेत राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला.यावेळी सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पांडूरंग फोपसे मार्गदर्शन करताना समाजातील नागरिकांचा,लोकप्रतिनिधीचा सहभाग घेऊन डेंग्यू आजाराविषयी जनजागृती करावी तर तालुका आरोग्य अधिकारी अधिकारी डॉ. गणेश जोगदंड यांनी यावर्षी असलेले राज्य शासनाचे घोषवाक्य तपासा, स्वच्छ करा आणि झाकुन ठेवा: डेंग्यूलाहरविण्याचे उपाय याविषयी सविस्तर माहिती दिली.

जिल्हा साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश जाधव यांनी राष्ट्रीय कीटकजन्य आजारांबाबत मार्गदर्शन करूनडेंग्यू या आजाराची लक्षणे, उपचार व घ्यावयाची काळजी आणि प्रतिबंधात्मक उपाय योजना याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींसारखे कणखर नेतृत्वामुळे देश सुरक्षित- ना. साकोरे

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १६ मे**

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सेनेने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानात घुसून नऊ दहशतवादी ठिकाणे उध्वस्त केली. अवघ्या २३ मिनीटात हे ऑपरेशन भारतीय सेनेने पूर्ण केले. त्यानंतर पाकिस्तानने डागलेले ४०० हून अधिक मिसाईल, ड्रोन हवेतच आमच्या सेनेने नष्ट केले. भारतीय सेना सक्षम आणि आत्मनिर्भर करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या प्रयत्नांचे हे फलित असून आज आमचा देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सारख्या कणखर नेतृत्वात सुरक्षित आहे, असे मत भाजपच्या हिंगोली संपर्कमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे यांनी व्यक्त केले.




येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी संपर्कमंत्री मेघनाताई साकोरे बोलतांना म्हणाल्या की, भारतीय जनता पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये राष्ट्राची सुरक्षितता प्रथम आणि त्यानंतर राजकारणाची बीजे रोवली जातात. देशाकडे जो वाकड्या नजरेने पाहील त्यांना अशाच प्रकारे उत्तर देण्यासाठी देशातील नेतृत्व सदैव तत्पर आहे. भारतीय सेनेला आत्मनिर्भर आणि सक्षम बनविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात अनेक महत्वाकांक्षी निर्णय घेण्यात आले. आम्ही तयार केलेले ब्रम्होस मिसाईल आज जगभरात प्रसिध्द झाले आहे. अनेक देश ब्रम्होस मिसाईलची मागणी करीत आहेत. भारतीय सेनेने त्यांची ताकद संपूर्ण जगाला दाखवली. अवघ्या चार दिवसांत पाकिस्तानाला गुडघे टेकवण्यास भाग पाडले. राजकीय इच्छाशक्ती, डिप्लोमेट पॉलिसी आणि महत्वाकांक्षी निर्णयामुळे आज देश प्रगतीपथावर आहे. जगातील पाचवी आर्थिक महासत्ता म्हणून भारताला स्थान मिळाले आहे. देशातील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्विकारले असून त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

यावेळी पुढे बोलतांना मेघना साकोरे म्हणाल्या की, आम्ही एका शिस्तप्रिय आणि राष्ट्रभिमान बाळगणाऱ्या पक्षाचे कार्यकर्ते आहोत. एकीकडे युध्द चालू असतांना देशातील सर्व व्यवहार सुरळीतपणे चालावेत, जनतेला युध्दाचा कोणताही फटका बसू नये यासाठी सर्वतोपरी काळजी घेण्यात आली. देशात सर्वच क्षेत्रात विकासाची कामे होत आहेत. सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी अनेक लोककल्याणकारी योजना आणि महत्वाकांक्षी योजना राबवल्या जात आहेत. या सर्व बाबींची माहीती भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तळागाळापर्यंत पोहोचवून भाजपचे संघटन मजबूत केले पाहीजे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपला निश्चितपणे जनता विजयी करणार आहे परंतु त्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जमिनीवर उतरूण प्रत्यक्ष काम केले पाहीजे असे आवाहनही यावेळी संपर्कमंत्री साकोरे यांनी केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यासपीठावर माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी सभापती पांडुरंग पाटील, सुभाष लदनिया, शिवाजीराव मुटकुळे, उमेश नागरे आदींची उपस्थिती होती.

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बहिणीच्या लग्नासाठी आलेल्या माहेरवासिनींच्या दागिन्यावर चोरट्यांचा डल्ला

**तभा वृतसेवा**
**नांदेडे, दि. १७ मे-**

माहेरी बहिणीच्या लग्नातील रात्रीला हळदीचा कार्यक्रम आटोपल्यानंतर गाढ झोपेत असलेल्या तीन माहेरवासिनींच्या गळ्यातील व कानातील अंदाजे एक लाख एकोणीस हजार सातशे रुपयाचे सोन्या चांदीच्या दागिन्यावर अज्ञात चोरट्याने डल्ला मारल्याची घटना दि. १७ मे रोजी शनिवारी रात्री दोन वाजताचे सुमारास तळेगाव येथे घडल्याने लग्नघरी खळबळ उडाली आहे.

हदगाव तालुक्यातील तळेगाव येथे दैवशाला आकाश बेलखेडे (वय २४) राहणार अंबोडा ता. महागाव जिल्हा यवतमाळ यांचेसह सोनाली मारोती हंबे, वर्षा श्रीराम बोडके आपल्या बहिणींच्या लग्नासाठी माहेरी वडिलांचे घरी आल्या होत्या. दि.१६ रोजी शुक्रवारी रात्री उशीरापर्यंत मेहंदी व हळदीचा रंगतदार कार्यक्रम आटोपून तिघीही अंगणात झोपल्या होत्या. तिघीही गाढ झोपेत असताना अज्ञात चोरटयांनी त्यांच्या गळ्यातील चार ग्रॅम सोन्याचे मणीमंगळसूत्र २८ हजार रुपये, कानातील अडीच ग्रॅम सोन्याचे झुंबर १७ हजार ५०० रुपये, साडेतीन ग्रॅम सोन्याची पोत २४ हजार ५०० रुपये, तीन ग्रॅम सोन्याचे पेंडोल २१ हजार रुपये, पायातील चांदीचे जोडावे ७०० रुपये, चार ग्रॅम सोन्याचे मनी मंगळसूत्र २८ हजार रुपये असा एकूण एक लाख एकोणीस हजार सातशे रुपये किंमतीचे सोन्याचांदीचे दागिने लंपास केले. शेवटी एका चिमुकल्याच्या गळ्यातील सोन्याचा दागिना तोडताना चिमुकला रडल्याने चोरट्यानी जागेवरून धूम ठोकली आणि चोरीचा प्रकार उघड झाला. या घटनेमुळे गावात सगळीकडेच खळबळ उडाली. ग्रामस्थांनी चोरट्यांचा पाठलाग केला. परंतु चोरटे पळून जाण्यात यशस्वी झाले. पुढील तपास जमादार पवार करीत आहेत. दैवशाला आकाश बेलखेडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तामसा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. चोरट्यांच्या तपासासाठी पोलिसांनी स्वान पथकाला प्रचारण केले होते. मात्र चोरट्यांचा माग सापडला नाही. सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार चक्रधर पवार करीत आहेत. तामसा शहरासह ग्रामीण भागात चोरट्यांनी डोके वर काढले असून पोलिसांनी बंद केलेली रात्रीचे गस्त चालू करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# खा. रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत काँग्रेसची निदर्शने



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ मे-**

ऑपरेशन सिंदूरचा मुख्य चेहरा असलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्या विषयी मध्यप्रदेशचे भाजपा मंत्री विजय शाह यांनी अवमानजनक व्यक्तव्य केले. दरम्यान नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण यांच्या विशेष उपस्थित व महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वात, शनिवार (ता.१७) रोजी मंत्री विजय शाह यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करत त्यांचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी मंत्री विजय शाह यांच्या राजिनाम्याची मागणी देखील करण्यात आली.

देशाचा अभिमान असलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्या बदल मध्यप्रदेशचे भाजपा मंत्री विजय शाह हे अवमानकारक विधान केले, यावर मा. न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. तरी देखील मंत्री विजय शाह यांचा राजिनामा भारतीय जनता पार्टी घेत नाही. हाच भाजपाचा खरा चेहरा आहे अशी टिका यावेळी खा. रवींद्र चव्हाण यांनी केली. दरम्यान खा. रवींद्र चव्हाण यांच्या विशेष उपस्थित व महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वात, शनिवार (ता.१७) रोजी, नवा मोंढा येथील शहर व जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालय येथे मंत्री विजय शाह यांच्या विरोधात जोडे मारो आंदोलन करत त्यांचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी मंत्री विजय शाह यांच्या राजिनाम्याची मागणी देखील करण्यात आली. यावेळी महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेंद्र घोडसकर, राजेश पावडे, अनिल मोरे, अब्दुल गफार, बालाजी चव्हाण, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, श्रीनिवास मोरे, अजिज कुरेशी, मुन्ना अब्बास, मुन्तजिब, माधवराव पवळे, नसिम पठाण, ज्योती कदम, रफिक पठाण, दिपकसिंग हजुरीया, संजय वाघमारे, गगन यादव, अतुल पेदेवाड, पिंटू पाटील आलेगावकर, शेख मुख्तार, तुषार पोहरे, धनंजय उमरीकर, गणेश कोकाटे, प्रसेन्नजित वाघमारे, गौतम सिरसाट, गोविंद पाटील, आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### बळीरामपुर सर्कलच्या वतीने मार्कंड येथे नवनिर्वाचित भाजपा पदाधिकारी बैठक

**नवीन नांदेड** -बळीरामपुर सर्कलच्या वतीने मार्कंड येथे नवनिर्वाचित भाजपा पदाधिकारी यांची बैठक माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांच्या वतीने नांदेड तालुक्यातील मार्केड येथे भाजपा महानगर अध्यक्ष माजी आमदार अमरभाऊ राजुरकर यांच्या सह नवनिर्वाचित भाजपा मंडळ पदाधिकारी यांच्या सत्कार करण्यात आला. माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे यांच्या वतीने आयोजित या बैठकीस उपस्थित सर्कल मधील सरपंच बूथ प्रमुख, शक्ति प्रमुख, सरपंच व सक्रिय कार्यकर्ते यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकड़े ,माजी नगरसेवक राजू काळे पाटील ,संजय मोरे ,उपशहर प्रमुख जयप्रकाश येवले,नांदेड दक्षिण मंडळ अध्यक्ष विश्वंभर शिंदे,सरपंच गंगाधर ऊर्फ पिंटू पाटिल शिंदे , सरपंच पुंडलिक मस्के ,माजी सरपंच साहेबराव सेलुकर,महेंद्र काळे,पिंटू काळे ,बालाजी काळे ,चिमणाजी पाटिल, यांची प्रमुख उपस्थिति होती. यावेळी बळीरामपुर, मार्कंड तुप्पा, काकंडी, बाभूळगाव, गुंडेगाव,धनगर वाड़ी,विष्णुपुरी,कल्हाळ,खुपसर वाडी,पिपंळगाव भनगी, वाहेगाव, राहेगाव, गंगाबेट,पांग़री गोपाळचावड़ी येथील भाजपा कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिति होती. यावेळी अमरभाऊ राजुरकर यांनी लवकरच येणाऱ्या निवडणुका संदर्भात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विश्वंभर शिंदे यानी केले तर आभार प्रदर्शन रमेश वाघमारे यानी मानले.यावेळी भाजपा कार्यकर्ते ,सरपंच,उपसरपंच ,पदाधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिति होती.

### तामसा भागात जोरदार पाऊस

**तामसा** -मागील बऱ्याच दिवसापासून ढगाळ वातावरण तयार झालेल्या तामसा भागात शुक्रवारी रात्री दहा वाजताचे सुमारास अगोदर तासभर जोरदार पाऊस त्यानंतर वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली होती. झालेल्या दमदार पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. तामसा परिसरात मागील दोन आठवड्यापासून दिवसभर रखरखते ऊन आणि सायंकाळी ढगाळ वातावरणाने पावसाळा सुदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. वादळी वाऱ्याची भीती जाणवत होती. परंतु वादळी वारे किंवा पाऊस काही पडत नव्हता. शुक्रवारी दिवसभर कडक ऊन तापले होते. सायंकाळपर्यंत पाऊस होण्याची शक्यताही नव्हती. मात्र रात्री दहा वाजताच्या सुमारास आकाशात अचानक काळेकुट ढग दाटून आले आणि दमदार पावसाला सुरुवात झाली. तासभर पडलेल्या पावसानंतर वादळी वारे आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. वीज गुल होऊन सर्वत्र अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले होते. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन तीव्र उन्हाची तीव्रता कमी झाली असली तरी शनिवारी दिवसभर भयंकर उकाडा होऊ लागल्याने नागरिक त्रस्त झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले. नांगरटीच्या शेतात पावसाचे पाणी साचल्याने ढेकळ मुरून जमीन फुलून आली आहे. पेरणीपूर्व मशागतीची कामे सोयीची झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. पेरणीपूर्व मशागतीच्या कामासाठी पाऊस अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. परंतु शेतात उभे असलेले उन्हाळी ज्वारीचे पीक काळे पडून ज्वारीचे नुकसान झाले आहे. जनावरांसाठी वर्षभरात लागणारा कडबा काळा पडल्याने शेतकरी परेशान झाला आहे. वादळी वारे विजांच्या कडकडाटासह झालेल्या पावसामुळे कुठेही जीवित हानी किंवा घरावरील पत्रे उडून नुकसान झाले नाही. थोडेफार नुकसान वगळता हा पाऊस पेरणीपूर्व मशागतीच्या कामासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरल्याने शेतकरी समाधानी झाला आहे.

### किनवट येथे कराटे स्पर्धेतील विजेत्यांना बेल्ट व प्रमाणपत्राचे वितरण




**किनवट, दि. १७ मे-** १६ मे रोजी सुभाषनगर येथील रेनबो डिजिटल प्रीस्कूल मध्ये, पुसद येथे दिनांक ११ मे रोजी महाराष्ट्र राज्य कराटे स्पर्धेत कू. गुंजन महेशसिंग ठाकूर यांच्या मार्गदर्शना खाली विशेष प्रविण्य मिळवलेल्या विधार्थाचा गौरव, नायेगाव येथिल कराटे प्रशिक्षक मा. राजेंद्रजी बैस सर याच्या हस्ते बेल्ट व प्रमाणपत्र वितरण करून, ओम आडे, श्रीनिवास जाकुलवार, माहेश्वरी जाकुलवार, झेन खान, रुद्रांश मेहता, अभिरुद्ध कट्टमवार यांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी बोलताना बैस सरांनी कराटे या युद्ध कलेचा इतिहास सांगितला. या कार्यक्रमांस उपस्थित डॉक्टर सूर्याकुमार धात्रक यांनी विधार्थाचे कौतुक करून, आभासा सोबतच शाररिक आरोग्याकडे लक्ष देण्याकरिता कराटेसारख्या कला ही काळाची गरज असल्याचे सांगितले. राजेंद्र धात्रकसर हे विधार्थांना मार्गदर्शन करताना, सशक्त समाजासाठी तसेच समाजात घडण्याऱ्या वाईट घटना रोकण्यासाठी कराटे सारख्या प्रशिक्षणाची अवशकता असल्याचे सांगितले, या युद्ध कलेचा उपयोग समाजासाठी कारण्याचे आवाहन विधार्थांना केले. रेनबो डिजिटल प्रीस्कूल च्या अध्यक्ष्या सौ. उषा धात्रक यांनी विदर्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. ९ या कार्यक्रमांस शांतीनिकेतन पब्लिक स्कूलच्या प्राचार्या सौ. ममता कट्टमवार यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचलन कू. गुंजन ठाकूर यांनी केले. त्या स्वतः कराटे प्रशिक्षिका आहेत. कार्यक्रम यशस्वीते साठी महेश ठाकूर, सोनिया ठाकूर, नाझिया पठाण, नीलम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून कू. गुंजन ठाकूर यांचा सत्कार करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कोसाई येथील श्री. हनुमान मंदिर व मारोती मंदिरात १५१ वा महाप्रसाद भंडारा उत्साहात





**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १७ मे-**

तेलंगणा येथील सुप्रसिद्ध कोसाई येथील श्री हनुमान मंदिर आणि मारोती मंदिरात गेल्या तीन वर्षांपासून किनवट येथील भाविक भक्त दर शनिवारी महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करत आहेत. या परंपरेनुसार, दिनांक १७ मे २०२५ रोजी १५१ वा महाप्रसाद भंडारा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धेने संपन्न झाला. अभय महाजन मित्रमंडळाच्या पुढाकाराने आयोजित या भंडाऱ्याला किनवट तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

या प्रसंगी किनवट नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष अभय महाजन, गजानन आगरमोरे, संजय सोनी, सुप्रसिद्ध व्यापारी तसेच ज्येष्ठ नागरिक गजानन नारलावार, किनवटचे प्रसिद्ध व्यापारी धर्मेंद्र पंढदरीया, संदीप राठोड, निखिल गोस्कुलवार आणि अक्षय पेन्शनवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या भंडाऱ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अभय महाजन मित्रमंडळ आणि किनवट येथील भाविकांनी विशेष परिश्रम घेतले.

तेलंगणा राज्यातील जागृत अशा कोसाई येथील श्री हनुमान मंदिर आणि मारोती मंदिरात आयोजित या महाप्रसाद भंडाऱ्याने भाविकांमध्ये श्रद्धा आणि एकतेचा संदेश पसरवला. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा धार्मिक आणि सामाजिक कार्यांना पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.

# आमदारांच्या हस्ते ड्रेनेजचे काम सुरू झाले असताना भूमाफियाने काम पाडले बंद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ मे-**

विठ्ठलराजनगर, कंथकनगर, चेतकनगर या भागातील ड्रेनेजचे काम आ. आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते सुरू झालेले काम येथील एका भूमाफियाने बंद पाडले असून महानगरपालिका प्रशासन मूग गिळून गप्प आहे. हे काम त्वरित सुरू करावे, अन्यथा महानगरपालिकेसमोर येथील नागरिक सोमवार, दि. १९ मे पासून आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन महापालिका आयुक्त यांना शुक्रवारी देण्यात आले.

विठ्ठलराजनगर, कंथकनगर, चेतकनगर या भागातील ड्रेनेज लाईनचे उद्घाटन दि. ६ मे रोजी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते करण्यात आले होते. तेथून २ ते ३ दिवस काम सुरळीत सुरू होते. परंतु तेथील काही भूमाफिया लोकांनी चालू असलेले काम थांबविले असल्याने येथील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. कारण ड्रेनेज लाईनचे पाईप सार्वजनिक १० फुटाच्या नाल्यातून जात आहेत. तेथील स्थानिक लोकांचा कोणताही विरोध नसून स्थानिक नागरिक आणि गोपाळचावडी ग्रामपंचायत या कामास सहकार्य करीत आहे. परंतु ही बाब काही भूमाफिया लोकांना पटत नसून त्याच पोटसुळकीतून त्यांनी हे काम कोणतेही कारण नसताना थांबविले आहे.

ड्रेनेज लाईनचे काम त्वरित सुरू करून येथील नागरिकांना न्याय द्यावा, अन्यथा महानगरपालिकेसमोर पुन्हा एकदा शेकडोंच्या जनसमुदायासह सोमवार, दि. १९ मे पासून आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे महापालिका आयुक्त यांना दिला आहे. या निवेदनावर यशवंत आवाळे, साहेबराव जोंधळे, मरिबा बसवंते, मनोज नांदेडकर, मोहन पुरी, फेरोज शेख, रूस्तुम शिंदे, आनंदा गंगातिरे, किरण कऱ्हाळे, अजय खटकेयांच्यासह येथील शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कु.शितल वाघमारे दहावी परीक्षेत यश

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. १७ मे-**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील पत्रकार तथा माजी उपसरपंच काशिनाथ वाघमारे यांची मुलगी कु.शितल काशिनाथ वाघमारे हिने लातूर बोर्डाकडून घेण्यात आलेल्या २०२५ च्या दहावी शालांत बोर्ड परीक्षेत महाळप्पा पटने विद्यालय शाळेतून ८७.४०% गुण मिळवत यश संपादन केले आहे.

तिने मिळवलेल्या या यशाबद्दल महाळप्पा पटने विद्यालयाचे संस्थापक सचिव शिवलिंगराव इबिते, संस्थेच्या अध्यक्षा गोदावरीताई इबिते, मुख्याध्यापक चंद्रशेखर लगडे,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्ग, संगीतकार प्रा.संदीप भुरे,कवी,गीतकार जाफर आदमपूरकर,राम हालबुर्गे,काशिनाथ पेंटे, गावकरी यासह अनेकांनी अभिनंदन केले

# कडब्याच्या गंजीला आग



**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १७ मे-**

तालुक्यातील पारडी येथील शेतकरी भगवान पवार यांच्या आखाड्या जवळील कडब्याच्या गंजीला आग लागून कडबा, सोयाबीनची गुळी व गवताची गंजी असे अंदाजे तिस हजार रुपायाचे नुकसान झाल्याचे दिसून आले. दुपारी दोन वाजता पारडी येथील भगवान पांडुरंग पवार यांच्या आखाड्या लगत

शेतातील शेजाऱ्याने गव्हाच्या गुळीला आग लावून दिली ती आग वाऱ्याने कडब्याच्या गंजीला लागून रौद्र रूप धारण केले.आग विजवण्यासाठी १०१ क्रमांकावर अग्निशामक दलास संपर्क केला असता संर्पक होऊ शकला नाही. उपविभागीय अधिकारी अरूणा संगेवार यांना संर्पक करून तात्काळ घटनेची माहिती दिली त्यांनी कंधार न.पा.च्या अग्निशामक दलाच्या गाडीस घटना स्थळी पाचारण केले. आग आटोक्यात आणली.मात्र तोपर्यंत कडब्याची गंजी,गवताची गंजी व गुळी राख झाली होत शेतकऱ्यांचे नुकसान मात्र झाले या घटनास्थळावरिल पंचनामा सुनेगाव सज्जाचे तलाठी परशुराम जाधव यांनी केला.

मोसमी पाऊस पुर्वी अवकाळी पाऊस व वादळाने लोहा तालुक्यातील अनेक ठिकाणी नुकसान केले आंबा,घरावरील,पत्रे फळबागांचे नुकसान झाले आहे अनेक ठिकाणी उघड्यावरील लग्न कार्येक्रमातील व-हाडी मंडळीची धावपळ उडाली.

# रामसिंग चव्हाण यांनी मुदखेडच्या नागरिकांची भागविली तहान



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १७ मे-**

मुदखेड शहरात ऐन उन्हाळ्यात नागरिकांना तीव्र पाणी टंचाईचा मुकाबला करावा लागत असताना वण वण भटकंती करन्याची वेळ आली होती भाजपचे शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांनी शहरात टँकर ने मोफत पाणी पुरवठा करत नागरिकांची तहान भागवली असुन या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमाचे कोतुक केले जात आहे.

सध्या राज्यात सगळीकडे दुष्काळाचे सावट असुन नागरिकांना कोसो दूर वरून पाणी आणावे लागत आहे. मागच्या दहा वर्ष्यात शहरासाठी महत्वपूर्ण दोन पाण्याच्या कायमस्वरूपी साठ कोटी रुपयांच्या योजना मंजूर करण्यात आल्या होत्या परंतु या योजनेअंतर्गत जलकुंभात थेंब भर ही पाणी आलेले नाही यामुळे नागरिकांना पाणी कोठून आणावे असा मोठा प्रश्न पडला होता. नगरपालिका अंतर्गत सन २०२१ मध्ये ४२ कोटी रुपयांचे योजना अजूनही अर्धवट अवस्थेत आहे.

भाजप शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांनी तीव्र पाणी टचाई लक्ष्यात घेऊन राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, भाजप महानगर अध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांच्या लोकसेवेतून बॅनर टँकर वर लावुन शहरात मोफत पाणी पुरवठा करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. विविध प्रभागात दररोज टँकरच्या आठ फेऱ्याच्या माध्यमातून नागरिकांची तहान भागविली आहे. शिवाजी नगर, वसंत नगर, वडार गल्ली, राम नगर, सन्मित्र नगर, शिक्षक कॉलनी, या भागात मोफत पाणी पुरवठा करण्यात येत आहे. रामसिंग चव्हाण यांच्या सामाजिक बांधिलकीचा उपक्रम ऐन उन्हाळ्यात नागरिकांची तहान भगवीणारा ठरल्याने सर्वत्र त्यांचे कोतुक केले जात आहे.

# नायगांव येथील कत्तलखान्यावर धाड टाकून पकडले गोमांस

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १७ मे-**

नायगांव येथील खाटीक गल्लीतील कत्तलखान्यावर धाड टाकून पोलिसांनी जवळपास १३ हजारांचे गोवंश मांस जप्त केले आहे. यामध्ये चार आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून. परिविक्षा धीन पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१६ में रोजी शुक्रवारी ही कारवाई करण्यात आली आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेली सविस्तर माहिती अशी की परिविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक किरण पोपळघट यांना गुप्त बातमीदाराने माहिती देवून खाटीक गल्लीतील कत्तलखान्यात गोवंश मांस विक्री होत असल्याचे सांगितले.उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांच्या आदेशान्वये नायगांव पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गजानन तोटेवाड, पोलीस. हेड.कॉन्सटेबल. साई सांगवीकर व या पथकाने पंचांसह खाटीक गल्ली भागातील कत्तलखान्यावर धाड टाकली असता तेथे गोवंशाचे मांस विक्री होत असल्याचे आढळून आले असता.पोलीस पथकाने हे गोवंश मांस व इतर साहित्य जप्त केले. जप्त केलेले गोवंश मांस जवळ पास ६२ किलो वजन भरले असून त्याची किंमत १२,४९० रुपये एवढी आहे.याघटनेत नायगांव पोलिसांनी खलील कुरेशी राहणार पिंपळगाव, मगदूम कुरेशी रा.नायगाव, तौफिक कुरेशी राहणार.

नायगांव, अजीम कुरेशी रा.नायगांव या चार जनांच्या विरोधात नायगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याची माहिती परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांनी दिली आहे. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांच्या नेतृत्वाखाली नायगांव शहरातील कत्तलखान्यावर करण्यात आलेल्या या कारवाईचे स्वागत होत असून अशा अवैध धंद्या विरोधातील कारवाई सतत सुरूच ठेवावी अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.

## जाहीर प्रगटन

मी, परवीन बेगम, वडील मोहम्मद अकबर, रा. हैदराबाद, भारत, माझा विवाह सईद खान, वडील भोले खान, रा. नांदेड, महाराष्ट्र, यांच्याशी दिनांक २१ एप्रिल १९८५ रोजी झाला होता.

या जाहीरनाम्यातून मी स्पष्टपणे जाहीर करते की, मी माझ्या पती सईद खान यांच्यापासून १६ मे २०२५ रोजी इस्लामिक शरीयतप्रमाणे खुला घेतले आहे. हा निर्णय मी माझ्या संपूर्ण स्वेच्छेने, पूर्ण शुद्धीने आणि कोणत्याही दबावाशिवाय घेतला आहे.

आजच्या तारखेपासून माझे आणि सईद खान यांचे कायदेशीर आणि धार्मिक वैवाहिक संबंध पूर्णपणे समाप्त झाले आहेत.

ही सूचना केवळ सार्वजनिक नोंद आणि माहितीपुरती प्रकाशित केली जात आहे.

मी हे स्पष्टपणे मान्य करते की या जाहीर प्रगटन ची पूर्ण जबाबदारी माझी राहील.

**जाहिर प्रगटन देणारे:**
**परवीन बेगम पि. मोहम्मद अकबर**
**रा. किंग कॉलनी, हैदराबाद**
+917093874359
**तारीख: १७ मे २०२५**

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# अस्मितेचा तेजोसूर्य



भारतीय सैन्यासहित स्त्री अस्मितेचा तेजोसूर्य मध्यरात्री पाकिस्तानात तेजाळून देशभक्तीचे केशर उधळत होता. हा क्षण अखिल विश्वाच्या इतिहासात स्त्री प्रतिष्ठेला, सन्मानाला मान्यता देणारा ठरला, यात शंकाच नाही. तो क्षण आला कर्तबगार लढवय्या स्त्री शक्ती आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या आपल्या खंबीर राष्ट्रीय नेतृत्वामुळे, म्हणजेच मोदींजीमुळेच! पहलगाममध्ये निरपराध नागरिकांची नृशंस हत्या करून भारताला डिवचून ललकारणाऱ्यांच्या उरात धडकी भरवण्यात यशस्वी ठरले ऑपरेशन सिंदूर! दहशतवाद्यांना प्रोत्साहन देणाऱ्यांच्या डोळ्यांत भारतीय क्षेपणास्त्र शक्तीने अंजन घातले. जाज्वल्य देशप्रेम, राष्ट्रभक्ती, शक्ती, तेज आणि सामर्थ्याचा अनुपम संगम घडून येत दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी तिन्ही सैन्य दलांनी एकत्रितपणे केलेली ही कारवाई होय. ऑपरेशन सिंदूर या शौर्यगाथेची माहिती जगासमोर मांडण्यासाठी स्त्रीशक्तीच्या योजनेने सर्व स्त्रीमनात या मर्मभेदी वज्रप्रहाराचा आनंद द्विगुणित झाला आणि ऊर अभिमानाने भरून आला.

देशाच्या संरक्षण यंत्रणेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन निर्भय, निर्भीड, रणरागिणींचे चेहरे जगासमोर आले. स्त्री काय करू शकते? असे म्हणणाऱ्यांच्या तोंडावर ही फार मोठी चपराक होती. कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह या दोन तेजस्विनींनी अतिशय आत्मविश्वासाने, ठामपणे, संयमित शब्दात ७ मे रोजी दिल्लीत आयोजित विशेष प्रेस ब्रिफिंगमध्ये ६ मेच्या मध्यरात्री भारताने पाकिस्तानात केलेल्या सिंदूर प्रहाराची, हिंदुस्थानाने घेतलेल्या प्रतिशोधाची माहिती दिली. या दोघींना भारताच्या परराष्ट्र सचिव विक्रम मेस्त्रींसह पत्रकार परिषद घेताना बघून दुर्गा आणि कालीचे दर्शन घडत आहे, असेच वाटले. महिषासुरमर्दिनी भारतीय स्त्रीच्या रूपात येथेच वास्तव्यास आहे, हा विश्वास दुणावला.

'हम भारत की नारी है, फूल नहीं, चिंगारी है' याचा प्रत्यय येत राहणार हे जाणवून मन सुखावलं. पहलगामच्या हल्ल्यात विधवा झालेल्या स्त्रियांना या सिंदुरास्त्राने जे दिले ते वर्णनातीत आहे. भ्याड अतिरेक्यांनी स्त्रियांना शक्तिहीन समजत, त्यांचा सिंदूर पुसून त्यांना दुःखाच्या आगीत होरपळून टाकले आणि मोदींना निरोप देण्यास सांगितले.

म्हणून या हल्ल्याचा प्रतिशोध घेणाऱ्या ऑपरेशन सिंदूरमध्ये महिलांचा समावेश करून त्यांचे शक्तीस्वरूपिणी रूप जगासमोर आणण्याचे महान कार्यही मोदीजींनी केले. समस्त महिलांना या मोहिमेचे नाव ऑपरेशन सिंदूर ठेवल्याचा अतिशय आनंद झाला. सिंदूर अर्थात कुंकू हे केवळ स्त्री सौभाग्याचे प्रतीक नसून, तिच्या आत्मसन्मानाचे प्रतीक आहे. ती आपल्या संस्कृतीची ओळख आहे आणि ती पुसून टाकायला निघालेल्यांना याच कुंकवाच्या नावाने धडा शिकवण्याचा निर्णय आपल्या संस्कृती सन्मान आणि राष्ट्ररक्षणासाठी घेण्यात आला, हे खरंच आनंददायी होय.

स्त्रीचे उदात्त मातृरुप जितके आपल्या परिचयाचे आहे तितकेच तिचे कणखर, खंबीर आणि करारी हेही रूप आता प्रत्येकाने आपल्या मनःपटलावर गोंदवून घ्यायला हवं. स्वतःला अबला समजणाऱ्या स्त्री वर्गाला यातून खचितच तेजाची फुलं गवसतील. आता येणाऱ्या प्रसंगांना सामोरं जाण्याचं धाडस सर्वांना दाखवावंच लागेल. भविष्यात राष्ट्र रक्षणात स्त्रियांचे महत्वपूर्ण योगदान असेल, याची ही नांदीच! तशा लेकीबाळी घडविण्यासाठी वातावरण निर्मिती करणे, हे आपले कर्तव्य होय. पंतप्रधानांनी इतकी मोठी संधी देऊन स्त्री सक्षमीकरणाकडे सुरू असलेली भारताची समर्थ वाटचाल जगासमोर प्रदर्शित केली. आता पुढे जाऊन स्त्रिया काय करू शकतील? हा प्रश्न विचारण्याची चूक कोणी करणार नाही, असा दबदबा या दोघींच्या धैर्यशील प्रेस ब्रिफींगने निर्माण केला. अतिरेक्यांचा कर्दनकाळ ठरण्याची क्षमता सर्व भारतीय सैनिक आणि नारीशक्तीत आहे याचा साक्षात्कार अतिरेक्यांसह सर्व जगाला झाला. भारतीयांच्या अपमानाचा बदला घेणारी ही लष्करी कारवाई आपले अचूक प्रगत तंत्रज्ञानही दर्शविते.


ऑपरेशन सिंदूर यशस्वी करून या विद्युल्लता कडाडल्या. या दोघी आता अनेकांचे प्रेरणास्थान झाल्यात. या निमित्ताने आपल्या सैन्य दलातील नारी शक्तीचा सर्वांना परिचय झाला. त्यांच्या कर्तृत्वाच्या कहाण्या जनमानसात स्त्री शक्तीविषयी गौरव वाढवत आहेत. स्त्री सन्मानाच्या दीप्तीने भारतीय तनमन उजळून निघाले. आपल्या कर्तृत्वाच्या चांदण्याने देशाला सुरक्षा प्रदान करणाऱ्या शूर वाघिणींचे कौतुक करावे तेवढे थोडेच! आपल्या शौर्य, साहस, धाडसाचा परिचय देत त्यांनी शत्रूचे कंबरडे तर मोडलेच शिवाय, राष्ट?ाचा विश्वासही सार्थ केला. युद्ध कौशल्य, कूटनीती, आत्मविश्वासाने स्थितीचे अवलोकन, विश्लेषण करण्याची भारतीय लष्करातील स्त्रियांची क्षमता वाखाणण्याजोगी आहे. प्रत्येक राष्ट्रभक्त स्त्रीच्या अंतर्मनात अभिमानाचे दीप तेवले. त्यांच्या लखलखाटात येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे आत्मिक बळ समस्त स्त्रीवर्गाला निश्चितच लाभले. आपल्या अनोख्या कामगिरीने जगातील सर्वांसाठी आयकॉन ठरल्या आहेत सोफिया आणि व्योमिका! राष्ट? रक्षणात मोलाची कामगिरी करणाऱ्यांसाठी लिंगभेद आता मागे पडतोय, हे चित्रही आनंददायी आहे.

लष्कराच्या अतिमहत्वाच्या, संवेदनशील कारवाईस जगासमोर आणण्यासाठी जेव्हा महिलांचे चेहरे समोर येतात तेव्हा या सन्माननीय बदलाची नोंद जागतिक इतिहासात स्त्री कर्तृत्वाच्या दमदार पाऊलखुणांनी सुवर्णांकित झाल्याशिवाय राहणार नाही. आपल्या राष्ट्रीय नेतृत्व व अभेद्य सुरक्षा प्रणालीवरील विश्वासाने भावी पिढीच्या मनी केवळ चांदणे न फुलता आता तेजोसूर्य तळपायला हवा. तसे झाले तर स्त्री सन्मानाच्या आणि दहशतवाद उच्चाटनाच्या वाटेवर हे शुभ संकेत ठरतील आणि भारत देश दहशतवादापासून मुक्त होईल अशी अपेक्षा बाळगून आपण भयमुक्त जीवन जगू शकू! चला तर 'वयं राष्ट्रे जागृयाम' या भावनेने राष्ट? कर्तव्यात तत्पर राहू या.

## संगीतिका

संगीता तांबोळी/९८२२७३९४९३

# पतझड सावन बसंत बहार...



निसर्ग हा आपला सगळ्यात मोठा गुरू! कितीतरी गोष्टी या निसर्गाकडून आपल्याला शिकता येतात. आपली पंचज्ञानेंद्रिये मात्र त्यासाठी अगदी जागृत हवी. आजूबाजूला बदलत जाणारे ऋतू, हवामान, प्रेक्षणीय निसर्ग हे तर माणसाला मिळालेलं सगळ्यात मोठं वरदानच म्हणायला हवं. हे सारं म्हणजे जणू निसर्ग देवतेचे आळोखेपिळोखे...! या बदलांचं वर्णन करणारं हे गाणं! वर्ष १९८७ मध्ये प्रदर्शित 'सिन्दुर' या कौटुंबिक चित्रपटातलं, लक्ष्मीकांत प्यारेलाल या प्रसिद्ध संगीतकार जोडगोळीचा परिसस्पर्श लाभलेली, गीतकार आनंद बक्षी यांची ही रचना!

*'पतझड सावन, बसंत बहार*
*एक बरस के मौसम चार...*
*पांचवा मौसम प्यार का, इंतजार का...'*

कौटुंबिक कथानक असलेला हा चित्रपट आणि त्यातील हे गाणं, बरंच लोकप्रिय झालं. आजही या गीताची मधाळ धून कानसेनांना तृप्त करते. तो काळच असा होता की, अर्थपूर्ण गाणी खरंच काळजात घर करायची. मध्यंतरी 'उन्हाळा, हिवाळा अन् पावसाळा या सोबतच जिव्हाळा सुद्धा जपा,' असा एक संदेश खूप व्हायरल झाला होता. खरंच! या तिन्ही ऋतूत हा जिव्हाळासुद्धा असावा, कायम असावा हे महत्त्वाचं! या भावनेचं वर्णन करणारं हे गीत! या चार मोसमांसोबत 'प्यार का मौसम' पण जपावा मंडळी, बरं का!

खरं तर पतझड, सावन, बसंत आणि बहार या माणसाच्या वेगवेगळ्या अवस्था म्हणता येतील आणि या सगळ्यात ठाम राहायला शिकवते ते म्हणजे प्रेम !किती छान वर्णन केले आहे. या पाचव्या मौसमाची वाट बघणं हासुद्धा एक आनंददायक अनुभव असतो.

कोकिळेचे मधुर गायन आपल्याला ऋतू बदलाची जाणीव तर करून देतेच पण, भर उन्हातही ही कोकिळा, आपल्याच धुंदीत गाते याचं जास्त अप्रूप वाटतं. काय सांगत असेल ती मानवजातीला! आजूबाजूला संकटरुपी वणवा जरी असेल, तरी आपला समतोल ढळू द्यायचा नाही. आपलं अस्तित्व हे इतरांना आशादायक वाटायला हवं, हेच सांगत असावी कदाचित!

आयुष्यात तरी किती ऋतू येत राहतात. भरभरून प्रेमाचा पण ऋतू आयुष्यात येतोच एकदा ! हा 'पांचवा मौसम' प्रत्येकाने मनसोक्त जगावा कारण तो जीवनभर ऊर्जा देऊन जातो हं !

आपल्या आजूबाजूला कितीतरी निरनिराळ्या रंगांची उधळण असते. जीवनधारासुद्धा तिचे वेगवेगळे रंग आपल्यासमोर सतत पसरवून ठेवते. एवढंच काय, आपल्या संपर्कातील माणसंसुद्धा... ते सुद्धा रंग बदलताना दिसतात, जाणवतात! मग काय आपण त्यांच्या वागण्याने हताश, उदास व्हायचं का? तर मुळीच नाही! या गाण्यात असं म्हटलंय. बघा...

*रंगों का मेला ये जग सारा...*
*रंग*
*बदलती जीवनधारा,*
*प्यार का रंग है सबसे प्यारा...*
*सारे जीवन मे एक बार !*

प्रेमऋतू माणसाला नखशिखांत बहरून टाकतो. दुसऱ्याच्या मनाचा विचार करायला शिकवतो आणि म्हणूनच प्रेमात पडलेली व्यक्ती खूप हळवी झालेली असते. आपल्या कवी कवयित्री यांनीसुद्धा आपल्या साहित्यात सांगितले आहे,'हे जग तुम्हाला प्रेमाने जिंकता येईल.'

प्रत्येक नात्याचा आधार म्हणजे त्यातील प्रेम, जिव्हाळा आहे. म्हणूनच तर उन्हाळा, पावसाळा, हिवाळ्यासोबतच जिव्हाळा देखील ऋतू अनुभवायचा असतो. जीवन पुढे चालतच राहणार, मौसम येणार जाणार, ऋतू बदलत जाणार! पण, ही प्रेमाची व्याप्ती मात्र कधीच बदलणार नाही. निसर्गातील हे ऋतुबदल माणसाच्या जीवनात ही होतात. निसर्गात पानगळ सुरू असते. माणसांच्या जीवनात ही तर कितीतरी बदल होत असतात. जुन्या-नव्याचा मेळ साधत पुढे पुढे आपण जायचं असतं. आयुष्यात कधी पतझड अनुभवावी लागेल तर, कधी हिरवागार श्रावण तुमच्यासाठी सुखाची पखरण करेल. दोन्ही परिस्थितीत समतोल साधणं महत्त्वाचं! कारण, ही स्थिती कायम राहणार नसतेच मुळी! आपले चारोळीकार चंद्रशेखर गोखले म्हणतात त्याप्रमाणे,

*'वाळकं पान गळताना सांगतं...*
*वसंत आता येणार आहे,*
*वसंत ओरडतच येतो...*
*मी लगेच जाणार आहे'*
*किती धावपळ आहे नं आयुष्यामध्ये!*

म्हणूनच म्हटलं आहे की, या रंग बदलणाऱ्या जीवनामध्ये स्वतःला सामावून घ्या. प्रेमासकट सामावून जा! आयुष्यातील प्रत्येक पानगळ अनुभवा ! श्रावण अनुभवा! वसंतोत्सव अनुभवा आणि बहरसुद्धा अनुभवा! आणि, हे सर्व करताना मन मात्र प्रेमानं ओथंबलेले राहू द्या. आयुष्याच्या संध्याकाळी, तुमच्यासाठी अगदी पतझड, सावन, बसंत, बहार नंतर हा पाचवा मौसम-प्यार का मौसम-तुमचं जगणं नक्कीच सुसह्य करेल. हा पाचवा प्रेमाचा ऋतू तुमच्या आयुष्यात येवो आणि तुमचं जीवन अधिक सुखकर करो, याच मनापासून शुभेच्छा!

> **कोकिळेचे मधुर गायन आपल्याला ऋतू बदलाची जाणीव तर करून देतेच पण, भर उन्हातही ही कोकिळा, आपल्याच धुंदीत गाते याचं जास्त अप्रूप वाटतं. काय सांगत असेल ती मानवजातीला! आजूबाजूला संकटरुपी वणवा जरी असेल, तरी आपला समतोल ढळू द्यायचा नाही. आपलं अस्तित्व हे इतरांना आशादायक वाटायला हवं, हेच सांगत असावी कदाचित! आयुष्यात तरी किती ऋतू येत राहतात. भरभरून प्रेमाचा पण ऋतू आयुष्यात येतोच एकदा ! हा 'पांचवा मौसम' प्रत्येकाने मनसोक्त जगावा कारण तो जीवनभर ऊर्जा देऊन जातो हं ! आपल्या आजूबाजूला कितीतरी निरनिराळ्या रंगांची उधळण असते. जीवनधारासुद्धा तिचे वेगवेगळे रंग आपल्यासमोर सतत पसरवून ठेवते.**

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# मुरली वाजवितो कान्हा...

शीर्षकावरूनच मी आज कोणता काव्यप्रकार घेतला आहे, हे आपल्या लक्षात आले असेलच. आज मी गवळण किंवा गौळण या मराठीतल्या काव्य प्रकाराविषयी बोलणार आहे. गौळण या मराठी काव्य प्रकाराची ओळख मला माहेरी वारकरी संप्रदायाची जी भजने होत, त्यात झाली. सर्वात आधी पंचपदी, त्याच्यानंतर विठ्ठनामाचा गजर, मग अनेक भजन व्हायची. ती झाली की, गौळण म्हटली जायची. गौळण हा प्रकार भजनाच्या उत्तरार्धात म्हटला जातो, ही परंपरा आहे आणि गौळण झाली की, पुन्हा इतर कोणतेही भजन म्हटले जात नाही. फक्त भैरवी होते आणि आरती केली जाते.

या गौळण प्रकाराने मला लहानपणापासून भारी भूल घातली. कारण, त्यात वर्णन केलेल्या श्रीकृष्णाच्या बाललीला, खोड्या, गोपिकांच्या तक्रारी हे सगळं बघून आणि ऐकून गंमत वाटायची. मात्र, शेवटी एका जनार्दनी वगैरे आलं की, त्याचा फारसा अर्थ त्या वयात कळत नसे. मात्र, आज आपल्या या सगळ्या संतांनी किती सुंदर गौळणी लिहिलेल्या आहेत, हे बघून आश्चर्यचकित व्हायला होतं. भजनातील गौळण गीत म्हणजे भगवंताच्या खोडकर लीलांना घातलेली भक्ति मय साद असते, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. संगीताच्या आणि तत्त्वज्ञानाच्या अंगाने आणि वाङ्मयीन भूमिकेतून गौळण हा काव्यप्रकार संत साहित्याच्या प्रासादिक दालनात लोकप्रिय झाला आहे. गौळण हे मराठीतील भावपूर्ण रूपक काव्य आहे. तसेच, गौळण हे भगवंताचं लीला संकीर्तन आहे.

गौळण हा मराठी साहित्यातील एक महत्त्वाचा काव्य प्रकार आहे जो प्रामुख्याने कृष्णभक्तीशी संबंधित आहे. या काव्य प्रकारात गवळणी, गोपाळ आणि त्यांच्या गाण्यांचा उल्लेख गवळण असा होतो, त्याचा समावेश आहे. यामध्ये कृष्ण आणि राधिका यांच्या प्रेमाची, भक्तीची भावना व्यक्त केली जाते, जी एक प्रकारे गायली जाणारी भगवंताची कविता, असा सहज सोपा अर्थ आजच्या काळात आपल्याला करता येईल. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज आणि संत एकनाथ महाराज यांच्यासह अनेक संतांनी अभंग, किर्तन, गौळण हे काव्यप्रकार आणि भक्तीरस हे सोबतच सर्वसामान्यांपर्यंत पोचवलेले आहेत.

गौळण हा भक्तीरस असून, तो पुढे १८ व्या शतकात लोकांच्या करमणुकीचे साधन बनला आणि त्यामुळे हा शृंगाररस प्रधान काव्यप्रकार आहे की काय? असा सर्वसामान्यांना प्रश्न पडणे साहजिक आहे. (अर्थात शाहीरी काव्याच्या वेळी गणगवळण वगैरे काव्यप्रचाराचा उल्लेख होईलच) अध्यात्माचा अर्थ शृंगाराच्या माध्यमातून सांगण्यासाठी कृष्णचरित्रातील लौकिक जीवन, रूपकासाठी निवडलेले भाग आणि कृष्णाची लीला गौळणीतून मांडली गेली. निरूपणाच्या अंगाने विचार केला तर, हे भगवंताचे लीला संकीर्तनच आहे हे अधिक चांगले पटते.

प्रामुख्याने संतांनी परमेश्वराविषयी अभंग लिहिले, भारुड लिहिले, गवळणी लिहिल्या. संत एकनाथ महाराजांनी त्या गौळणींना एक वेगळे रूप दिले. त्यामुळे, गौळणी म्हटल्यावर त्या फक्त संत एकनाथ महाराजांच्याच असतील, असा आपल्याला भास होतो.

आता गवळण किंवा गौळण शब्दाचा अर्थ काय? गौळण म्हणजे दूध विकणारी स्त्री होय. पूर्वी गाईचे दूध काढल्यापासून तर ते बाजारात नेऊन विकण्यापर्यंत सगळी कामं ही स्त्रीचीच होती. दुधाबरोबरच ती दही, ताक आणि लोणी असे दुधाचे प्रकारही विकत असे. नंदकुमार श्रीकृष्ण हा मदनाहून सुंदर होता. गोकुळातल्या गोपी कृष्णावर जिवेभावे आसक्त झाल्या. त्या भगवंताच्या समीप आल्या आणि भक्तीच्या आत्मनिवेदन अवस्थेने त्यांनी कृष्णाला आपलंसं केलं. करताना म्हणतात...

**दुडी वर दुडी साते निघाली ।**
**गवळण गोरस घ्या म्हणो विसरली ॥**
**'गोविंद घ्या,कोणी दामोदर घ्या'। गे तव हासती ॥**
(साते म्हणजे बाजाराला, सात म्हणजे बाजार)



डोक्यावर दह्यादुधाचे माठ घेऊन मथुरेच्या बाजाराला गेलेल्या गवळणी दही घ्या, दूध घ्या असं म्हणायलाही विसरल्या आणि त्या ऐवजी गोविंद घ्या, गोपाळ घ्या, दामोदर घ्या असं म्हणू लागल्या. भक्ती प्रेमात स्मृतीची देखील स्मृती उरत नाही. दोघेही एकमेकांच्या प्रेमात पूर्ण बुडून गेलेले असतात.

गवळणीत प्रणय आहे, बोध आहे, विलास आहे, विरह आहे, सुख आहे, वेदना आहे आणि शेवटी प्रेमभक्तीचा उत्कट आविष्कार आहे. परमात्मा किंवा भगवंत हा वेदांच्या श्रुतींना कळणार कसा? या गवळणी वेदांच्या श्रुती गवळणी होऊन भगवंताचा लाभ घेऊ लागल्या. गोपी कृष्णाचे प्रेम हे जीवात्म्याचे परमात्म्याविषयी असणारे अत्यंत सुरेख प्रेम आहे. ती ओढ म्हणजे क्षराला अक्षराची लागलेली आर्त ओढ आहे. विविध रूपकांतून गौळणीतील अध्यात्म मांडले जाते. राधा, गवळणी, गोपी, कृष्ण, मुरली, गाई गुरे, नंद आणि यशोदा या सर्वांभोवती गुंफलेले हे लीला दर्शन आहे. राधा विलास काव्यातून अत्यंत मोहकपणे हा काव्यप्रकार उलगडला जातो. एक गौळण बघू या !

***नको वाजवू श्रीहरी मुरली***
***तुझ्या मुरलीने तहान भूक हरली रे ॥ धृ ॥***
***घरी करीत होते कामधंदा***
***तेथे मी गडबडली रे ॥ १ ॥***
***घागर घेऊन पाणीयाशी जाता***
***डोईवर घागर पाझरली ॥ २ ॥***
***एका जनार्दनी पूर्ण कृपेने***
***राधा गवळण बावरली रे ॥ ३ ॥***

मंडळी, गवळण या काव्यप्रकाराविषयी पुढल्या लेखात बोलूच. आज संत एकनाथ महाराजांची सुप्रसिद्ध गवळण या ठिकाणी देते आणि थांबते. आपण भेटू या पुढील शनिवारी...

***कशी जाऊ मी वृंदावना***
***मुरली वाजवितो कान्हा ॥ धृ ॥***
***पैलतिरी हरी वाजवी मुरली***
***नदी भरली यमुना ॥***
***कासे पितांबर कस्तुरी टिळक***
***कुंडल शोभे काना ॥***
***काय करू बाई कोणाला सांगू***
***नामाची सांगड आणा ॥***
***नंदाच्या हरीने कौतुक केले***
***जाणे अंतरीच्या खुणा ॥***
***एका जनार्दनी मनी म्हणा***
***देव महात्म्य कळेना कोणा ॥***

## वाडा चिरेबंदी

विलास कोळी/ ९७६३०८४४९९

# वाड्यातील निरीक्षणे

वाडा हा स्थापत्यकला म्हणून बघायला हवं. त्याकडे बघताना, प्रत्येक घटक आणि त्याचे कार्य बघून समजून घ्यायला हवे. ते उगाचच केलेले नाहीत. त्यामागे काहीतरी कार्यभाव आहेत. मग ते दरवाज्यावरील सूर्यचंद्र असू द्या, लाकडावरील कोरीव काम असू द्या, दगडावरील कोरीव काम असू द्या, वाड्यातील स्तंभ, त्या स्तंभावर कोरलेले काम हे सगळं बघणं. त्यात आपल्या पूर्वजांचं राहणं, त्यातील बारकावे, सुरक्षितता आणि निसर्गाचं संवर्धन भरपूर गोष्टी वाडा पहायला गेल्यावर आपल्याला समजतात. आपण गड किल्ले किंवा ऐतिहासिक वास्तू बघायला जातो त्यावेळी तेथील लिहिलेल्या पाट्या, मार्गदर्शक किंवा जे आपल्या ऐकिवात आहे त्यावरच आपण त्याचा अंदाज बांधतो.

'मी वाडा-गढ्या पाहिल्या' असं म्हणतात परंतु आपण त्यात कायकाय पाहिलं? हे मात्र सांगता येत नाही. नुसतंच वास्तू बघणं किवां आपण तिथं जाऊन आलो, फोटो/व्हिडीओद्वारे सिद्ध करणं नसून त्यापलीकडे काही असते. म्हणजे तो कसा बांधला? मटेरियल कुठले वापरले? किती काळापासून ते टिकून आहे? ते टिकवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी काय तंत्रज्ञान वापरलं? ज्याच्या रचनेने भल्याभल्या संशोधकांना विचारात टाकलं, ज्याच्या भव्यतेची कल्पना आजही आपण करू शकत नाही, असे दुसरे वाडे बांधणे तर सोडाच पण आज जे आहे ते समजून घेण्याची मानसिकता आपली नाही. यापेक्षा दुसरी शोकांतिका काय?

शाळेतून आलेल्या कित्येक सहलीतील मुलांना एकाही शिक्षकाने ह्यातली एकही गोष्ट सांगितली नसेल, हे मी पैजेवर सांगू शकतो. आपण फक्त आकार दिलेले दगड पुढल्या पिढीला दाखवतो की, हे आमच्या पूर्वजांनी बांधले आहे. पण, ते बांधताना त्यात जे तंत्रज्ञान वापरलं गेलं याबद्दल आमची पिढी अनभिज्ञ आहे तर आम्ही पुढच्या पिढीला काय सांगणार?

एक किस्सा सांगतो. मी एक वाडा पहायला गेलो होतो. निवांतपणे माझे वाडा पाहणे चालू होते, निरीक्षण चालू होते. त्याचवेळी, एका कॉलेजची सहल तिथे आली. त्याचे स्टाईलमध्ये फोटो काढणं चालू होतं. काहीजण सेल्फी घेण्यात मग्न होते. त्यातीलच एक जाणकार सर्वांना मस्त गमतीशीर माहिती सांगत होता. या वाड्यात 'रमामाधव'चे शुटींग झाले, याठिकाणी नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांच्याही काही सिनेमाचे शॉट झाले आहेत, रझाकारच्या मारामारीचा शॉट याच ठिकाणी झाला, इथे 'बाजीराव मस्तानी' सिनेमातील शॉट झाला, 'पद्मावती'चे काही शुटींग इथे झाले, शाहरूख खान येथे अन् सलमान खान तिथे



बसला होता, इत्यादी माहिती अगदी बिनचूकपणे संवादासह, ॲक्शन करून दाखवत होता. या साऱ्या चित्रपटांच्या कथा त्या मुलामुलींना तोंडपाठ होत्या. आले होते ते वाडा बघायला आणि चर्चा भलतीच चालू होती.

माझे वाडा पाहून संपल्यावर मीही मुद्दामहून त्यांच्यात सामील झालो. त्यांच्या कॉलेजचे नाव विचारले, मुलामुलींच्या ओळखी करून घेतल्या, मग मी त्यांना विचारलं की, हा वाडा कोणी बांधला? का बांधला? वाडा बांधण्यासाठी हे मोठमोठाले दगड कोठून आणले? ते वाहून कसे आणले? ते वर कसे चढवले? त्यावरील नक्षीकाम कोणी केले? बांधकाम कुठल्या काळातील आहे? किती वर्षांपूर्वी याची निर्मिती झाली? हा वाडा कोणाचा आहे व का बांधला आहे? इतकी वर्षे झाली अजून तो कसा टिकून आहे? असे विचारल्यावर सगळेच संभ्रमात पडले. थोडक्यात आपल्या इतिहासाशी वास्तूंविषयी, जागेविषयी आजकालच्या पिढीला काही देणंघेणं नाही, हे मला जाणवलं.

आपल्याकडे गड किल्ले, पुरातन वास्तू, वाडे, गढ्या, त्याचे स्थापत्यशास्त्र, त्यांचा इतिहास, त्यावरील कलाकुसर, रंगकाम यांचे महत्व काळाच्या प्रवाहात वेगाने नाश होत आहेत. त्यांचे जतन, डागडुजी, संवर्धन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. अर्थात इतरांना दोष देत बसण्यापेक्षा मी काय करू शकतो? यावर माझा विचार सुरू झाला. मग त्यातूनच एक कल्पना सुचली. मी एवढे गड, किल्ले, गढ्या, वाडे पाहिले, त्यांचा थोडा नवा-जुना इतिहास, माहिती आणि मला प्रत्यक्ष आलेले अनुभव यांचे मिश्रण करून वाड्यातील त्या अबोल एलिमेंटसलाच बोलतं करायचं. सार्वजनिक वाचनालये, काही वयस्कर जुनीजाणती माणसं यांना प्रत्यक्ष भेटून, काही जणांच्या व्यक्तिगत संग्रहातील माहिती पुस्तके मिळवून, त्यांचे वाचन करून काही महत्वाच्या नोंदी नमूद करण्याचे काम सुरू केले. व्यक्ति तितक्या प्रकृती या म्हणीप्रमाणे माणसांच्या नानाविध स्वभावांचा, वेगवेगळ्या प्रवृत्ती, आपल्याकडील माहिती देण्याची टाळाटाळ करण्याची वृत्ती, नकारात्मक विचारांचा प्रभाव, आपल्याकडे असलेले जुने साहित्य त्याची माहिती साधी झेरॉक्ससाठीही उपलब्ध करून न देण्याची वृत्ती, आपल्या परिसराबद्दलची उदासिनता हे देखील मी अनुभवलं. अर्थात काही अपवादात्मक मंडळी आदराने आपल्याकडचे सर्व ज्ञान, माहिती, पुस्तकांचे संदर्भ उदार मनाने उपलब्ध करून देतात. काहीजण म्हणतात की, या निर्जीव वाड्यांमध्ये कोणती प्रेरणा देण्याची शक्ती असते? पण, अशा निर्जीव असलेल्या वस्तू आणि वास्तू खऱ्या अर्थाने त्या चैतन्याने भरलेल्या असतात. रायगड आणि कुलुमनाली एकाच उंचीवर असले तरीसुद्धा रायगडावर मनात येणारे विचार आणि कुलूमनालीला गेल्यावर येणारे विचार यामध्ये जमीनअस्मानाचा फरक आहे. असं वाटतं की, गड, किल्ले, जुने वाडे, गढ्या ही योग्य प्रकाराची मार्गदर्शन करण्याची केंद्र आहेत. सगळी माहिती प्रथम जाणून घेतली आणि आपल्या आसपास असलेल्या स्थळांना या निमित्ताने भेट देऊन, त्यावरील कलाकुसर पाहिली, ते निर्माण करण्यामागची कारणे समजून घेतली तर ते बघण्याची मज्जा आणि पर्यटन अधिक समृद्ध होईल, यात शंकाच नाही.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com






बीड शहरातील नगर रस्त्याचे काम मागिल दोन वर्षांहून अधिक कालावधीनंतरही पुर्ण झालेले नाही. त्यामुळे छ. शिवाजी महाराज चौकात नेहमीच वाहतुकीच्या कोंडीची समस्या निर्माण होते. येथे वाहतुक पोलिसही कधीतरी सोयीच्या वेळी हजर असतात. त्यामुळे शहरातील नागरीकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. (छाया–कृष्णा शिंदे)

# भारतीयत्वाचे शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्था प्रसिद्ध–ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर

(खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या नवीन वास्तूच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम थाटामाटात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ मे**

भारतीयत्वाचे शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने नावलौकिक मिळविणारी संस्था म्हणून प्रसिद्धी शैक्षणिक गुणवत्तेतून मिळवली आहे नवीन येऊ घातलेल्या शैक्षणिक धोरणामध्येही भारतीय शिक्षण याचा समावेश करण्यात आला आहे.नवीन शैक्षणिक धोरणातून आपले भारतीय विचार विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.त्याच्या आपण शिक्षण संस्था म्हणून आपण सज्ञ आहातच असे दिसते.आपल्या या होणा–या नवीन वास्तू निर्माणातून समाजात चांगले नागरीक घडावेत.यासाठी मी माझ्याकडून मनस्वी शुभेच्छा देतो व या चांगल्या कार्यासाठी संस्था म्हणून आपण मला आमंत्रित केले याबद्दल कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली.



याप्रसंगी मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष विजय वालवडकर, स्थानिक कार्यवाह किरण कोदरकर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती, भारत माता व अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमांचे पूजनाने करण्यात आली .तत्पूर्वी माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे व सौ.सुचिता देशपांडे यांच्या हस्ते पूजा विधी पार पडले.त्यानंतर ह.भ.प.चैतन्य महाराज देगलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर, कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,डॉ.शरदराव हेबाळकर, सौ.शरयु हेबाळकर,प्रा.रा.गो.धाट सर, जिल्हा संघकार्यवाह बिपीन क्षीरसागर,सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,संस्था सभासद यांच्या हस्ते नारळ वाढवुन व कुदळ मारून भूमीपूजन संपन्न करण्यात आले. यावेळी संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी शुभेच्छा देताना म्हणाले की,आपल्या या संकुलातून आजपर्यंत अनेक चांगले विद्यार्थी घडले आहेत.ते कार्य अविरत रहावे यासाठी शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सुरेंद्र आलूरकर म्हणाले की,या शैक्षणिक संकुलाची शैक्षणिक गुणवत्ता चांगली आहे हे निकालावरून दिसतेच आहे. त्यात सातत्य ठेवणे आवश्यक आहे.त्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजय वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर, खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे, प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी,खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राथमिक,माध्यमिक,महाविद्यालयातील, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या सहकार संकुल बांधकामास ना.अजितदादा पवार यांच्याकडुन हिरवा कंदिल

## आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ मे**

बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सहकार विभागाचा भुखंड मागील अनेक वर्षापासुन बांधकामाच्या प्रतिक्षेत आहे. या भुखंडावर सहकार विभागातील सर्व कार्यालयांसाठी एकत्रित प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन बीड शहराच्या वैभवात भर घालील अशी आकर्षक व देखणी वास्तु उभारावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. ना. अजितदादा पवार यांनी सहकार संकुलाच्या बांधकामास हिरवा कंदिल दाखविला असुन प्रशासनाला या बाबतचे आदेश दिले आहेत. इमारत बांधकामाचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तु शास्त्रज्ञाकडुन तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला मिळाले आहेत. पालकमंत्री म्हणुन बीड जिल्ह्यासाठी सहकार संकुलाची प्रशासकीय इमारत ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातुन मिळणार आहे.

बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सर्व्हे नंबर १७९९ मध्ये सहकार आयुक्त यांच्या नावाने १५१५.९४ चौरस मिटर आकारमानाचा भुखंड आहे. या शासकीय भुखंडावर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित होते. शहरातील काही व्यापाऱ्यांनी खाजगी प्रयोजनासाठी या जागेची मागणी शासनाकडे केली होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या जागेवर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाचे बांधकाम व्हावे यासाठी पाठपुरावा व प्रयत्न केले. ना. अजितदादा पवार यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पाडेल अशी आकर्षक वास्तु निर्माण करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांना साकडे घातले. आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला त्यांनी हिरवा कंदिल दाखवत सहकार संकुलाच्या बांधकामास मान्यता दिली आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक, देखरेख संघ यासह सहकार विभागातील लेखा परिक्षण विभागाची कार्यालये आणि सहकार विभागाशी संबंधित प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सहकार संकुलात समाविष्ट करुन ही सर्व कार्यालये एका छताखाली आणुन सहकार विभागाची मुख्य प्रशासकीय इमारत बांधण्याचा मार्ग या माध्यमातुन मोकळा झाला आहे. पालकमंत्री म्हणुन ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर घालणारी शासकीय वास्तु जिल्हायाच्या ठिकाणी उभारत असल्याचे समाधान आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले आहे.



## शेख फैजान फारुख ९३.६० टक्के तर शेख रेहान अब्दुलनबी ९०.४० टक्के उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ मे**

अभिनव माध्यमिक विद्यालय परळी एस एस सी बोर्ड परीक्षा मार्च २०२५ मध्ये शेख फैजान फारुख ९३.६० % व फौंडेशन येथे शेख रेहान अब्दुलनबी ९०.४० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहे. या घवघवीत यशाबद्दल त्यांचे नातेवाईक व आदीनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या दोन चुलत भावाच्या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. ते लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असून त्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशामागे चिकाटी, मेहनत, पालकांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात येत आहे. अभिनव विद्यालय व फौंडेशन शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदांनी यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सोमवारी अजित पवार बीड जिल्हा दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ मे**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार सोमवारी बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते जिल्हा नियोजन समितीसह इतरही बैठका घेणार आहेत. बीडचे पालकमंत्री झाल्यानंतरचा त्यांचा हा बीडचा तिसरा दौरा असणार आहे.



बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची सूत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहेत. अजित पवारांनी मागच्या दौऱ्यात जिल्हा प्रशासनातील विविध बाबींचा आढावा घेतला होता, तसेच प्रशासन गतिमान करण्याच्या सूचना दिल्या होत्या. बीड जिल्हयात विमानतळ तसेच इतर बाबींसाठी अजित पवारांनी पुढाकार घेतला होता. अजित पवारांच्या मागच्या दौऱ्यानंत बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बदली होऊन विवेक जॉन्सन बीडचे जिल्हाधिकारी म्हणून पाहत आहेत. आता अजित पवार सोमवारी (दि. १९) बीड जिल्हयाच्या दौऱ्यावर येत आहेत. यात ते नियोजन समितीची बैठक, खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक आणि विकास योजनांची आढावा बैठक घेणार आहेत.

# बरसत्या पावसात महिला मंडळ अधिकाऱ्यांनी रस्ता केला मोकळा

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे लोकाभिमुख प्रशासन तहसीलदार शेळके यांचेकडून माणुसकीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ मे**

सध्या राज्यात छत्रपती शिवाजी महाराज समाधान योजना राबविणे सुरु आहे . महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेत आहेत . छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्यामार्फत सस्ती अदालत राबविण्यात येत आहे . पूर्ण विभागात शिबीरे आयोजित करण्यात आली असून , ही शिबिरे ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडवण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत .



बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने प्रभावी कामगिरी करत नागरिकांची तातडीने मदत करण्याचा चंग बांधला आहे .

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा शेतकऱ्यांचे रस्ते खुले करण्यावर खूप भर असतो . म्हाळसापूर येथील शेतकऱ्यांसाठी तहसीलदारांनी तातडीने निर्णय घेत मंडळ अधिकारी वंदना विघ्ने व तलाठी विलास शिंदे यांना रस्ता खुला करण्याचे निर्देश दिले . त्यांनीही गुरुवार १५ मे रोजी भर पावसात तातडीने कारवाई करत अनेक दिवसांपासून बंद असलेला शेत रस्ता खुला केला . सुंदर हरिबा धापसे , पांडुरंग सुंदर धापसे यांना गेली चार वर्ष शेतात जाण्यासाठी रस्ता नव्हता . मंडळ अधिकारी वंदना विघ्ने यांनी अंगद बाबासाहेब खांडे व इतर यांना विश्वासात घेत बांधावरील रस्ता खुला केला . यावेळी पोलीस प्रशासनातर्फे हवालदार मनिषा केदार , श्री धोंडे उपस्थित होते . या रस्त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी जाणे सुलभ झाले असून त्यांच्या दैनंदिन कामांमध्ये मोठा दिलासा मिळाला आहे . पावसामुळे रस्ता बंद झाल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती . मात्र , स्थानिक प्रशासनाने दाखवलेली तत्परता व संवेदनशीलता यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे .

शुक्रवारी अशाच प्रकारे पारगाव शिरस येथे पारगाव शिरस व शहाबाजपूर गावचा सुमारे दीड किलोमीटर शिवरस्ता मोकळा करण्यात आला . हा अडवलेला शिवरस्ता सामोपचाराने खुला करून देताना मंडळाधिकारी स्मिता गुंजाळ शेळके , ग्राम महसूल अधिकारी विजय बहिर सरपंच दिनकर जमदाडे यांनी कौशल्य पणाला लावले . हा रस्ता सुमारे ६० शेतकऱ्यांना उपयोगी पडणार आहे . यावेळी रामकिसन वाटमोडे , मगन कणसे , अरूण कणसे , बळीराम शेंडगे , विश्वम्बर कणसे , राजाभाऊ कणसे , देवीदास उबाळे , विठ्ठल कणसे , त्रिंबक रसाळ , जालींदर कणसे , लहू कणसे , नारायण कणसे , बबन टेकवले , सूदाम कणसे , तिर्थराज रसाळ , रामभाऊ रसाळ , बाळू कणसे , गंगाराम रसाळ उपस्थित होते .

असाच एक रस्ता बेलुरा येथे शुक्रवारी मोकळा करण्यात आला . येथील गट नंबर १३५ व ११८ गाडी रस्त्याच्या तक्रार अर्जानुसार अर्जदार देवजी गवते विरुद्ध गैरअर्जदार श्रीमंत साहेबराव गवते यांचा पानंद रस्ते खुला करण्यात आला . आपसात समेट घडवून आणून या ठिकाणचा रस्ता दोघांच्या संमतीने / तडजोडीने खुला करण्यात आला . या वेळी मंडळ अधिकारी प्रभू येवले , ग्राम महसूल अधिकारी उत्तरेश्वर खांडे व गावकरी उपस्थित होते .

तालुक्यात अशा प्रकारे रस्ते खुले होत असल्याने शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानत हा उपक्रम गरजूंसाठी संजीवनी ठरत असल्याचे सांगितले . मागील सहा महिन्यात सुमारे ५० किलोमीटर रस्ते मोकळे झाल्याचे नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी सांगितले .जनतेमध्ये प्रशासनाविषयी विश्वास वाढत असून हा उपक्रम इतर ठिकाणीही राबवावा , अशी मागणी होत आहे . पावसामुळे रस्ते बंद झाल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती . मात्र , स्थानिक प्रशासनाने दाखवलेली तत्परता व संवेदनशीलता यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानत हा उपक्रम गरजूंसाठी संजीवनी ठरत असल्याचे सांगितले . या कार्यवाहीमुळे जनतेमध्ये प्रशासनाविषयी विश्वास वाढत असून हा उपक्रम इतर ठिकाणीही राबवावा , अशी मागणी होत आहे .

# बुद्धांच्या मानवतावादी शिकवणीला गतिमान करण्यात प्राचीन धम्म परिषदेचे अनन्य साधारण महत्व–प्रा.डॉ.अनिल सिंगारे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ मे**

तथागत गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वानानंतर बुद्धांच्या मानवतावादी विचारांची रुजवणूक करण्यासाठी प्राचीन कालीन धम्मपरिषदांचे महत्व अनन्यसाधारण असून यामुळेच खऱ्या अर्थाने भारतासह विविध देशात बुद्धांच्या विचारांचा प्रसार व प्रचार झाल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ अनिल सिंगारे यांनी श्रावस्ती बौद्ध विहारात बुद्ध पौर्णिमेनिमित्त बोलताना व्यक्त केले.

तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित माजलगाव येथील श्रावस्ती बौद्ध विहारात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव होते.तर प्रमुख मार्गदर्शक प्रा.डॉ.अनिल सिंगारे होते.यावेळी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,सौ.इंगोले मॅडम ,शहर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ,सौ.अंजली सूर्यतळ, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, बा. समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे,नवनाथ धाईजे, रिपाइं तालुकाध्यक्ष अविनाश जावळे,वंचित बहुजन आघाडीचे सचिन उजगरे, माजी नगरसेवक सचिन डोंगरे,भीमराव टाकणखार, अशोक मगर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी बुद्ध पो. नि. राहुल सूर्यतळ व सौ.अंजली राहुल सूर्यतळ यांच्या हस्ते बोधिवृक्षाचे पूजन व पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करून झाले.यावेळी प्राचीन कालीन बौद्ध धम्म परिषदांचे महत्त्व या विषयावर बोलताना प्रा.डॉ. अनिल सिंगारे म्हणाले की, प्राचीन कालखंडामध्ये सम्राट आजादशत्रू , राजा कालाशोक, सम्राट अशोक, राजा कनिष्क यांच्या काळात प्राचीन धम्मपरिषदा झाल्या. याधम्मपरिषदामध्ये बुद्धांच्या शिकवणीचे लेखन करून बुद्ध, धम्म व संघ या त्रीरत्नाला अनुसरून बुद्धाच्या मानवतावादी विचाराची रुजवणूक करण्यात आली. प्राचीन धम्मपरिषदात त्रिपिटके लिहिण्यात आले. त्यामुळेच आपणास आज बुद्धांच्या शिकवण्याच माहिती मिळते आहे.

यावेळी बोलताना बाबुराव पोटभरे म्हणाले की, तथागतचा भगवा म्हणजे त्यागाचा व समर्पणाचा विचार आहे. भगवाचे अनुकरण म्हणजे भगवान . बुध्दांनी माणसाच्या प्रगतीचा आणि माणूसपणाचा विचार केला. बौद्ध धम्म हा विज्ञानावर आधारित धम्म आहे.

याप्रसंगी पोलिस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी आपले विचार व्यक्त केले. तसेच अभिजीत बाबुराव पोटभरे,व सिनेअभिनेते विश्वजीत बाबुराव पोटभरे यांच्या वतीने सर्वांना रुचकर भोजनदान देण्यात आले.

यावेळी सदधम्म सेवा संघाचे सदस्य सोपान उजगरे, मळीबा चंदमारे, रविकांत उघडे,विकास डोंगरदिवे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पांडुरंग जाधव यांनी केले.सूत्रसंचलन नवनाथ शिनगारे यांनी केले तर आभार गौतम घनघाव यांनी मानले. बुद्ध जयंती निमित्त बोलताना उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले म्हणाले की, विपश्यनेमुळे मानवाच्या विचाराची चेतना आणि संवेदना जागी होते. चेतना व संवेदना जागृत झालेला माणूस हा समाजासाठी एका विशिष्ट ध्येयाने काम करत असतो. आपण कोणतेही काम करा ते कुशल असावे.. कोणतेही क्षेत्र असू द्या. तुम्ही जे काम करताना ते उत्तम करावं हीच आपल्यासाठी विपश्यना असते..

# मुख्याध्यापक भगवानराव पोटभरे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ मे**

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्त केंद्रीय मुख्याध्यापक भगवानराव चांगुजी पोटभरे यांचे वयाच्या ७९ वर्षी दिनांक १५ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथील इस्पितळात निधन झाले.



माजलगाव शहर व तालुक्यात जिल्हा परिषद शाळेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले होते. एक कर्तव्यदक्ष शिक्षक म्हणून काम करत होते. निवृत्त होते वेळेस ते माजलगाव तालुक्यातील मंगरूळ शाळेवर मुख्याध्यापक व सावरगाव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक होते. त्यांच्या अकस्मित निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. .त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले एक मुलगी,जावई,पुतने सुना,नातवंडे असा परिवार आहे ते गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील विषय तज्ञ लक्ष्मण पोटभरे यांचे वडील होते.भगवानराव पोटभरे यांच्यावर मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला. यावेळी राजकीय, सामाजिक ,शैक्षणिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

# महावितरण सहाय्यक अभियंता पदावर कु. अमृता लखापती रूजू

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ मे**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (MSEDCL/ महावितरण) च्या परळी उपविभागीय कार्यालयात आज, दि. १५ मे रोजी कु. अमृता संजय लखापती सहाय्यक अभियंता (वर्ग २) पदावर त्रीरर्वीरींश एपसळपशशी ढीरळपशश म्हणून रुजू झाल्या. प्रभारी उपकार्यकारी अभियंता अभिजीत राठोड यांनी त्यांना रुजू करून घेतले.कु. अमृता लखापती यांचे परळी उपविभागात आगमन झाल्यावर कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. कनिष्ठ अभियंता रूपाली घोडगे, सहाय्यक लेखापाल संतोष आलापुरे आणि निम लिपिक वीरेंद्र शिंपी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.यावेळी प्रभारी उपकार्यकारी अभियंता अभिजीत राठोड यांनी कुमारी लखापती यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या पुढील वाटचालीस मार्गदर्शन केले.



कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांनीही त्यांच्यासोबत संवाद साधला आणि त्यांना सहकार्याचे आश्वासन दिले. कु.अमृता लखापती यांच्या नियुक्तीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.